28 FEBRUARY TO 06 MARCH 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 26/02/2022 9:48 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : १० सोमवार दि. २८ फेब्रुवारी २०२२ ते रविवार दि. ०६ मार्च २०२२ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

भाजी मार्केटवाल्या गुन्हेगाराचा भरदुपारी घात झाला
चार गोळ्या लागताच ढगात जाण्याचा 'समय' आला | ३

व्याभिचारी मुलीचे लफडे उघडकीस आले
आईच्या मदतीने तिने बापालाच ठार केले | ३

रुग्णाचा मृत्यू अखेर प्राणावर बेतला
डॉक्टरला ठार मारून भावाने सूड घेतला | ३

जन्मदात्या मातेमुळे मातृत्व कलंकित झाले
प्रियकरासाठी पोटच्या पोरालाच ठार केले | ३

दारूच्या पार्टीतच अचूक साधला नेम
५ लाखांसाठी केला मटका किंगचा गेम | ३




जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांच्या पायथ्याशी असलेल्या वाकोद या छोट्याशा गावात भाऊंचा जन्म. अजिंठा परिसरातील शक्तिस्थानांचा ऊर्जाशील प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आयुष्यभर राहिला.

*– चित्र : श्री. सुहास बहुळकर*

# द्रष्टा

या द्रष्टाची दृष्ट काढूया हा सृष्टीचा दूत
डोंगरमाळावरी घडविला चमत्कार अद्भूत

पाण्याचे निर्माण कराया अपुरे अपुले हात
हा थेंबाला मिळवून देतो नियोजनाची साथ

हा शेताला धमणी होवून योग्य पाजवी पाणी
तृषार्त राने तृप्त होवून लहरत गाती गाणी

हा मातीचा असीम प्रेमी झिजला मातीसाठी
या मातीच्या कणाकणातून पिकले माणिक मोती

हा बैलांची पूजा बांधतो हा कृषकांचा साथी
संस्काराची देतो दौलत पुढील पिढीच्या हाती

हा आईचा पुत्र लाडका मातृभक्त हा गुणी
'ती अणि मी' एकच म्हणतो हा कांतेचा ऋणी

सज्जनशक्ती उभी राहूनी समाज व्हावा थोर
मातृभूमिच्या उत्कर्षाचा सदाच याला घोर

हा गांधीचा भक्त मातीचे सत्य पुकारी यास
हा उद्यमीवीर नवाच याला सत्य शांतीचा ध्यास

*– इंद्रजित भालेराव*

## श्रद्धेय भवरलालजी जैन यांना श्रद्धावंदनदिनी कृतज्ञतापूर्वक प्रणाम...

*जन्म : १२ डिसेंबर १९३७ निर्वाण : २५ फेब्रुवारी २०१६*

कांताई नेत्रालय – आय केयर फॉर यू
जैन स्पोर्टस् अकॅडमी – आरोग्य. आत्मनिर्भर. अभेद्यता.
बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट
भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन – www.bkjfoundation.org
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. – कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी. – www.jains.com
भवरलालजी आणि कांताई जैन परिवार – www.bhavarlaljain.in
जैन फार्म फ्रेश फुड्स् लि. – मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य. – www.jainfarmfresh.com
गांधी रिसर्च फाऊंडेशन – • सत्य • अहिंसा • शांती – www.gandhifoundation.net
अनुभूति स्कूल – www.anubhutischool.in
गौराई कृषी-तंत्र निकेतन
भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी

CMYK

28 FEBRUARY TO 06 MARCH 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 26/02/2022 9:49 PM Page 1



पान १ वरून....

## व्यभिचारी मुलीचे लफडे उघडकीस आले...

तास दोन तास झाले तरी सुजाताचा तोंडाचा पट्टा चालू असायचा ती गप्प राहायची नाही, सारखे तोच तोच विषय घेऊन सासूला काही तरी बोलत राहयची. त्यामुळे घरी शांतीनाथ आले की त्याची आई त्यांना त्याच्या बायको विषयी सांगत होती. ती विनाकारण भांडते मलाच उलटे बोलते असे सांगून शांतीनाथ याला तुझ्या बायकोला समज दे. असे सांगत होत्या.पण ती कोणाचेच काही ऐकत नव्हती. अलकिडे तर मोठी मुलगी साक्षीने ही आपल्या आईच्या पावलावर पाऊल ठेवीत तिने ही एका तरूणाबरोबर आपले संबंध ठेवले होते. खाण तशी माती या म्हणीप्रमाणे त्या दोघी ही वागत होत्या. म्हणून सासू सूनेला म्हणत होती की, तू जर सरळ वागली नाही याचे परिणाम गंभीर होतील तू स्वतः ही सरळ वाग आणि मुलीला ही सरळ वागायला शिकव त्या असे म्हणत असायच्या म्हणून याचा राग सुजाताला येत होता. ती सासुला म्हणत होती तुम्ही आमच्या वागण्याकडे लक्ष देवू नका. आणि तुम्ही मध्ये चोमडेपणा ही करू नका यातून दररोजचा वाद हा वाढतच जात होता. भांडणात शांतीनाथ हे पत्नी सुजाताला तिच्या बाहेरच्या अफेयरला धरून बोलत होते. तिला समज देत होते. पण ती काही त्याचे ऐकत नव्हती, उलट ती त्यांनाच बोलत होती. नवरा आपल्या अफेयरला विररोध करत आहे. त्यात सासू मीठ घालत आहे, त्यामुळे ती ही नवऱ्यावर चिडत होती. पत्नीचे बाहेर ख्याली संबंध हे कोणत्याच नवऱ्याला मान्य नसतात म्हणून ते त्या संबंधाला विरोध करीत असतात तसेच शांतीनाथ याचे झाले होते. त्यातच त्याचा स्वभाव हा भांडखोर आणि तापट होता. ते पत्नी ऐकत नाही म्हणून तिला मारहाण ही करायला मागेपुढे बघत नव्हते. भरल्या घरात भांडणाने जोर धरला होता. त्यातच अलिकडे शांतीनाथ हे घरच्या भांडणाला वैतागून दारू प्यायला लागले होते. घराकडे येताना ते दारू पिवून येत होते. भांडण वाढले की ते दारूच्या नशेत पत्नी, मुलीना त्याच्या अफेयरवरून नको नको ते बोलत होते. घराचा नुसता तमाशा झाला होता. शांतीनाथ हे घरच्या भांडणात काहीच करू शकत नव्हते. ते पत्नी मुलीच्या वागण्यापुढे हतबल झाले होते पत्नीचे बाहेरख्याली लफडे आणि मुलीचे अफेयर यातून मुलगी येणाऱ्या स्थळाला नकार देत होती. त्यामुळे त्या दोघीच्या वागण्याची चर्चा ही पै पाहुण्यात आणि भाऊबंदात होऊ लागली होती. त्यातून घरातील कलहाने डोके वर काढले होते. मंगळवार दि.२२ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजणेच्या सुमारास त्याच्या घरात भांडणे लागली होती. किवी मार्ट बंद करून ते घरी आले होते.घरात संध्याकाळच्या वेळेला सुजाताची सासूबरोबरयाच कारणातून भांडण झाले होते. तिचा राग अजून शांत झाला नव्हता. तिच्या मनाची धुसमुस सुरूच होती. घरात शांतीनाथ आल्यावर परत भांडणाला जोर चढला. दोघी सासू, सूना भांडू लागल्या होत्या. एकमेकींवर आरोप प्रत्यारोप चालूच होते. दोघीचे भांडण मिटवू पर्यत शांतीनाथच्या नाकी नऊ आले होते. दोघी ही ऐकायला तयार नव्हत्या आणि शांत ही होत नव्हत्या. त्याच्या ही रागाचा पारा चढला होता.त्यातच ते पत्नीला शिव्या देत तुझ्या बाहेरख्याली वागण्यामुळे भांडणे होत आहेत म्हणून मारहाण करायला पुढे गेले होते. त्यांनी दारूच्या नशेत साक्षीच्या अफेयरवर ही बोट ठेवीत तिला ही खरे खोटे सुनावू लागले होते. त्याच्या तर हे सगळे सहनशक्तीच्या पलीकडे गेले होते. त्यातच मोठी मुलगी २१ वर्षीय साक्षी हिने त्या भांडणात तोंड घालून पप्पा तुम्ही गप्प बस. तुम्ही आता दारू पिवून आला आहात. भांडण उगीच वाढवू नका, मम्मीची काही चुक नाही, तिला मारू नका असे म्हणाली,त्यावर शांतीनाथ याचा रागाचा पारा अजूनच जास्त चढला. ते तिला ही तु अजून लहान आहेस का? तुला काही कळत नाही का? असे म्हटले. कुठला वाद कुठे तरी पोहचला होता. दारूच्या नशेत ते काही तरी बोलत आहेत आणि ऐकत ही नाही म्हणून साक्षी ही चिडली होती. तुमच्यामुळे घरात भांडणे लागतात, तुम्ही शांत राह असे म्हणत सगळ्या चुकीचे खापर ती त्याचेवर फोडत होती. त्यातच सुजाता ही साक्षीची बाजू घेवून बोलत होती ती तिला पंसत असणाऱ्या मुलाबरोबरच लग्न करेल असे ती शांतीनाथ आणि सासू यांना बोलत होती. तर शांतीनाथ व त्याची आई त्या दोघीना तुमचे वागणे सुधारा नाही तर घरातून चालते व्हा असे सांगत होते. आम्हाला तुमचे वागणे पंसत नाही तुम्ही कोणाबरोबर लफडे करता त्याचे सोबतच राह असे शांतीनाथ म्हणाला. त्यावर माय लेकींचा रागाचा पारा चढला. कुणीच कोणाचे ऐकत नव्हते.सगळ्याना राग अनावर झाला होता. शांतीनाथ हे सुजाताला मारहाण करायला गेल्यावर साक्षीने त्याना अडविले होते. तिने त्यांना बाजुला ढकुलन दिल्यावर ते खाली पडले. त्यामुळे त्यांचा राग परत वाढला होता. ते माय लेकींना अर्वाच्च भाषेत शिव्या देवू लागल्यावर साक्षीला राग आला. तिने आपल्या आईला त्याचे तावडीतून सोडवून घेऊन पप्पाना रागावत तुम्ही हे काही चांगले करीत नाही, म्हणत बाजुलाच पडलेला लोंखडी कटावणी उचलली आणि त्याच्या डोक्यात घातली. त्यासरशी ते ओरडतच खाली लेळू लागले त्यांची आई त्यांना सोडवायला गेली तर त्यांनी तिला ही मारहाण केली इकडे शांतीनाथ यांच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. कुणाला काही कळायच्या आत साक्षीकडून अनपेक्षीतपणे ही घटना घडली होती. तिच्या ही रागाचा पारा चढला होता. एवढयाचवरच त्या दोघी थांबल्या नाहीत त्यांनी परत बॅटने मारहाण केली आणि त्याचे अंगावर चाकूने सपासप वार केले. त्यासरशी ते जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडले. कुणाला काय करावे ते कळत नव्हते. सगळ्याचा आरडा ओरडा सुरू झाला होता. कन्नड भाषेत शांतीनाथची आई रडत शिव्या देवू लागली होती. घरातील ओरडण्याने शेजारी ही धावून आले होते. शांतीनाथ हे जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडले होते. शेजाऱ्यांनी क्षणाचा ही बिलंब न लावता त्यांना तताडीने जवळच्या अलायन्स या खाजगी दवाखान्यात नेले.तेथील डॉक्टरांनी त्याची गंभीर अवस्था बघून आयजीएम रूग्णालयात नेण्याचा सल्ला त्यांना दिला. त्यांना तेथून लगेच आयजीएम रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेची माहिती लगेच आयजीएमच्या डॉक्टरांनी शिवाजीनगर पोलीसांना दिली. तर इकडे आपल्या हातून शांतीनाथ याचा खून झाल्याचे बघून साक्षी व तिची आई सुजाता यांनी स्वत:ला सावरत शिवाजीनगर पोलीस स्टेशन गाठले. नाईट ड्युयीला असणाऱ्यां पोलीस अधिकाऱ्याना त्यांनी सगळी हकीकत सांगितली. साक्षीने आपल्या हातून भांडणात रागाच्या भरात आपल्या वडिलांचा खून झाल्याचे पोलीसाना सांगितल्यावर पोलीस ही चक्रावून गेले.पो.निरी. महादेव वाघमोडे यांनी त्या दोघीनी सांगितलेल्या ठिकाणी जावून घटनेची पाहणी केली. तसेच आयजीएम हॉस्पिटल मध्ये जावून तेथील डॉक्टराच्याकडून माहिती घेतली.ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची कल्पना त्यांना आली होती. घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, पोलीस उपाधिक्षक बाबुराव महामुनी यांनी भेट देवून घटनेची पाहणी केली. पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या.आयजीम हॉस्पिटलमध्ये शवविच्छेदनाचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. रात्री उशिरा मयत शांतीनाथ केटकाळे यांचा चुलत भाऊ महावीर केटकाळे याच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात मायलेकीं दोघीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शांतीनाथ आण्णाप्पा केटकाळे (वय ५२) यांच्या खून प्रकरणी सुजाता शांतीनाथ केटकाळे आणि त्याची मुलगी साक्षी शांतीनाथ केटकाळे (वय २१) याच्या विरोधात गुन्हा रजि.नं ९१ /२०२२ भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोदवून दुसऱ्या दिवशी त्याना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता मा.कोर्टाने दोघींना २८फेब्रुवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लोखंडी कटावणी, बॅट व चाकू जप्त केला होता. ही घटना सुरूवातीला कौटुंबिक कलहातून घडली आहे असे वाटत असताना दुसऱ्या दिवशी पोलीसांना मायलेकींनी दिलेल्या जबाबात त्या दोघीच्या अफेयरबाबात पोलीसांना माहिती दिली शांतीनाथ यांचा आपल्या अफेयराला विरोध असल्याने भांडणात आम्ही त्याना मारून टाकले असे त्यांनी सांगितले. या घटनेचा पुढील तपास पो.निरी महादोव वाघमोडे याच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत घरची परिस्थीती सधन असली तरी माय लेकी या तशा चालूच होत्या. दोघीनी ही आपआपले अफेयर बाहेर ठेवले होते. त्यातून कलह होणे साहजिक होते. भांडणात साक्षीला राग आवरता आला नसल्याने तिने रागाच्या भरात जन्मदात्या बापाच्या डोक्यात लोंखडी कटावणी घातली आणि खूनाच्या गुन्हयात अपसुक अडकली. तर तिच्या आईने ही भांडणात तिच्या वडिलांना मारयला चिथावणी दिली. बाहेर ख्याली संबंधात महिला या कुठल्या कुठे वाहत जातात हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारूच्या पार्टीतच अचूक साधला...

विश्वासाने चालतो तितक्याच विश्वासाने एकद्याचा घात ही केला जातो. म्हणून तर अनेक मटका बुकी वाल्याचे ठिक ठिकाणी मर्डर झाले आहेत बुहदा हे मर्डर त्याच्या त्याच्या आर्थिक कारणातून झाले आहे. अनेकजण मटका बुकीवाले स्वत:जवळ घातक शस्त्र अस्त्र बंदुका वापरत असतात. त्यामुळे किरकोळ कारणातून जरी त्याचे वाद झाले तरी गोली मार भेजे मे म्हणत ते एकाद्याची सहजच गेम करतात. सातारा जिल्याहातील शिरवळ येथे ही रविवार २० फेब्रुवारी रोजी खंडाळा येथील लेक पॅलेसच्या अपार्टमेटच्या टेरसवर पुण्यातील संजय सुभाष पाटोळे या मटका किंगवाल्याचा गोळी घालून खून करण्यात आला.शिरवळ पोलीसाना या घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीस तपासात संजय पाटोळे याचा खून त्याच्याच सहकार्यानी आर्थिक कारणातून केल्याचे प्राथमिक स्वरूपात माहिती मिळाली होती. पोलीसांनी या घटनेतील सहा संशयीताना जेरबंद केल्यानंतर याची शहनिशा झाली. रविवार दि.२० फेब्रुवारी २०२२ रोजी खंडाळा तुलक्यातील लेक पॅलेस या ठिकाणी काही तरूण पार्टी करण्यासाठी एकत्र आले होते. त्या पॅलेसमध्ये त्यांनी सुरूवातीला एक रुमबुक केली. त्यानंतर ८ ते १० जण संध्याकाळच्या वेळेला टेरेस वर हे सर्व जण पार्टी करीत होती. प्रत्येकजण नॉनव्हेज जेवणावर ताव मारत विहस्कीच्या पेग वर पेगे रिचवत होते. प्रत्येकांना दारूची नशा भिनभिनली होती. त्यातच काही वेळाने कशाचा तरी आवाज झाल्याचे ऐकु आल्याने खालचे लोक वरती पळत आले. परंतु वरच्या लोकांनी त्याना वरती काही झाले नाही म्हणत त्यांना खाली जाण्यास सांगितले. हॉटेल मॅनेजमेटला ही काही समजले नाही.कशाचा तरी मोठा आवाज झाला झाल्याने वरचे लोक भिऊन खाली येत होते. टेरसवरील एका तरूणाच्या डोक्यात त्याच्यासोबत पार्टी करणाऱ्यांनी गोळी घातली होती. त्यात ती व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. याची कुणकुण कोणालाच काही लागलेली नव्हती.काही तरी लफडे आहे आणि लोच्या झाला आहे हे टेरेसवरून पळत येणाऱ्या लोकांनी ओळखले होते. त्यामुळे वरती काय झाले आहे हे हॉटेलमॅनेजमेटच्या लोकांना ही कळाले नाही. रात्रीच्या सुमारास त्याचा वेटर येवन दरवाजा बंद करून गेला होता. तो दरवाजा दुसऱ्या दिवशी संध्याकाळी साफसफाईला येणाऱ्या माहिलेने उघडले होते. ती साफ सफाई करताना तिला टेरसेच्या वरती रक्ताच्या थारोळ्यात एका तरूणाचा मृतदेह पडल्याचे दिसले त्याच्या भोवतीचे रक्त ही सुखले होते. त्याच्या अंगावरती माशा बसत होत्या. तिने या घटनेची माहिती हॉटेल मॅनेजमेंटच्या लोकांना दिल्यावर त्यांनी ही वरती येवून पाहिले होते. ही घटना त्यांनी शिरवळ पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करीत असताना मृत तरूणाची ओळख पटविणेसाठी त्यांनी त्याची अगं झडती घेतली असता काही कागदपत्रे त्याचेकडे मिळून आली. त्यावरून पोलीसांनी त्याचे नाव संजय सुभाष पाटोळे (वय ३१ चिमेवाडी, पुणे) असल्याचे समजले.यावरून पोलीसांनी त्याच्या घरच्या लोकाशी संपर्क साधला असता त्याना ही घटनास्थळी बोलावून घेऊन मयताची ओळख पटविण्यात आली होती. मयताची ओळख पटविल्यानंतर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सातारा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. मयत संजय पाटोळे याची पोलीसांनी माहिती काढली असता तो रेकॉर्डवरील गुन्हेगार असून तो पुण्यातील त्याच्या भागात मटका घेत असल्याचे व तो मटका किंग असल्याची माहिती पोलीसांनी मिळाली. तो मटका किंग असल्याने त्याची हत्या ही गुन्हेगारी टोळीकडून झाली असावी अशी शंका पोलीसांनी व्यक्त करून तपासाला सुरवात केली. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही समातंर करीत होते. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे एक पथक या घटनेच्या तपासासाठी पुण्याला रवाना करण्यात आले.

पोलीसांनी तपासाला अधिक गती देत मयत संजय पाटोले हा मटका व्यवसायीक असल्याने त्या अनुषंगाने तपास चालविला होता. पोलीसाना घटनास्थळी सापडलेल्या वस्तु कागदपत्रे, त्याची प्राथमिक माहिती गोळा करून संशयीत आरोपीपर्यंत एसीबीचे पथक पोहोचले होते. संशयीत आरोपी हा कोंढवा पोलीस ठाण्यातील मोक्यातील आरोपी असून तो गेल्या सहा वर्षापासून फरारी आहे तरबेज सुतार असे त्याचे नाव असल्याची माहिती पोलीसाना मिळाली. तो फलटण येथे पळून गेल्याची माहिती तांत्रीक तपासाद्वारे पोलीसांना मिळाल्यावर तातडीने हालचाल करीत पोलीसांनी त्याला फलटण येथून ताब्यात घेवून त्याला सातारा येथे आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली तसेच या घटनेतील इतर सात संशयीत आरोपीची नावे ही पोलीसांना सांगितली. तरबेज सुतार हा ही मटका घेत होता. परंतू गेल्या सहा वर्षापूर्वी त्याचेवर मोका अंतर्गत कारवाई झाल्याने तो पळून गेला होता. तेव्हापासून तो आजतगायत कोंढवा पोलीसाना गुंगारा देत होता. या घटनेपूर्वी त्याचे संजय पाटोळेशी मटक्याच्या व्यववहारातून आर्थिक देवाण घेवाण झाली होती. संजय पाटोळे हा त्याचे जवळ पास लाखाच्या घरात देणे लागत होता. ती रक्कम तरेबज सुतार हा वेळोवेळी त्याचेकडे परत मागत होता. पण ती रक्कम संजय पाटोळे हा त्याला परत देत नव्हता. धंदा बंद असल्याचे कारण तो त्याला सांगत होता. त्यामुळे तरबेज हा त्याचेवर चिडून होता. या संज्याला काही तरी करून धडा शिकवायलाच पाहिजे असे त्याने विचार केला. गेल्या पाच सहा वर्षापूर्वी मटका धंदा तेजीत होता त्यावेळी तरबेज याने त्याला रक्कम दिली होती. काही केल्या ती रक्कम परत देत नव्हता. संजय हा भेटायला बोलविल्यावर देखील येत नव्हता. तसेच तो त्याचा फोन देखील उचलत नव्हता. या गोष्टीचा राग तरबेज सुतार याला येत होता. म्हणून त्याने त्याला बाहेर गाठायचे ठरविले. तसा तो कुठे सापडतो याची तरबेज सुतार हा माहिती काढत होता. पुण्यात ही तरेबज याच्या माणसांना तो मिळत नव्हता.ते सर्वजण संजय पाटोळेच्या मागा वर होते.त्यातच याना माहिती मिळाली की, तो शनिवार, रविवार सातारा जवळील खंडाळा येथील लेक पॅलेसवर इन्जॉय करण्यासाठी येणार आहे. त्याने या गोष्टीची कल्पना आपले मित्र विकी जाधव, शंकर पारवे, नितीश पतंगे, राकेश गायकवाड, किरण सांळुखे,यांना दिली. आता यावेळी संज्या पाटोळेची गेम करायचीच हे ठरवून त्यांनी त्याला रविवार दि.२० फेब्रुवारी रोजी लेक पॅलेसमध्ये गाठले.त्यावेळी पाटोळे हा दारू पित बसला होता. तेथे अचानक तरेबज सुतार आणि त्याच्या मित्रांना बघून संजय पाटोळे हा घाबरला परंतु तो ही काही कच्चा गुरुचा चेला नव्हता. त्याने त्यानां टेबलाला बसविले त्याच्या खाण्या पिण्याची सगळी सोय केली. त्याची पार्टी रंगात येत असताना तरबेज सुतार याने त्याच्याकडे पैशाची मागणी केली.

आपला आधीच व्यवहार पुर्ण कर असे तो त्याला म्हणाला, त्यावर संजय पाटोळे हा त्याला मी तुझे पैसे देणे लागत नाही त्यामुळे कुठेले पैसे आणि कसाला व्यवहार म्हणाला. यामुळेतरबेज हा त्याचेवर चिडला. त्याला शिव्या देत थांब तुला दाखवितो कुठला व्यवहार आणि कुठली रक्कम म्हणत त्याच्या डोक्यातला पिस्तुल लावली. त्याला घाबरवत पैसे देणार की नाही म्हणत धमकी दिली त्यावर संजय याने ही तुझ्या असल्या धमकीला मी काय घाबरतो की काय तुला असे वाटते का म्हणत उठून उभा राहत असताना त्याने त्याची बदुंक खाली पाडली. त्यासरशर तरबेज आणि त्याच्या मित्रांनी त्याला मारहाण करायला सुरूवात केली. त्या घाई गडबडीत तरबेज याने खाली पडलेली बंदुक उचलत मर साल्या म्हणत त्याच्या डोकीत गोळी घातली. संजय पाटोळे हा रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला. मोठ्याने आवाज झाल्याने तो आणि त्याचे मित्र सावध झाले होते. ते सर्वजण लेक पॅलेसच्या मागील बाजूने पळून गेले.सकडे या घटनेची माहिती कुणाला कळली नाही. मोठया आवाजाने लोक सैरभैर होऊप पळत होते. दुसऱ्या दिवशी साफ सफाई करणाऱ्या महिलेला टेरेसवर एका तरूणचा मृतदेह पडल्याचे दिसल्यावर तिने या घटनेची माहिती दिल्यावर लेक पॅलेसच्या मॅनेजमेटला या घटनेची माहिती मिळाली. त्यांनी ही माहिती शिरवळ पोलीसाना दिली.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना संशयीत आरोपीची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसाना मिळाली. तरबेज सुतार याला ताब्यात घेतल्यावर या गुन्हयाची उकल करण्यात पोलीसाना यश आले. पोलीसांनी या घटनेतील तरबेज मंमद सुताररा. वरखडेनगर, कात्रज पुणे, विकी राजेंद्र जाधव रा.वानवडी केदारीनगर पुणे, शंकर अश्रुबा पारवे रा.बिबेवाडी, नितीश पंतगे, रा. सुखसागर बिबेवाडी पुणे, राकेश सुरेश गायकवाड रा.अप्पर कोंढवा पुणे आणि किरण बाबुराव सांळुखेरा. आंबेगाव पठार पुणे याना ताब्यात घेऊन त्याचेवर शिरवळ पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या गुन्हया खाली नोंद करून त्याना सातारा येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेतील इतर दोन संशयीत आरोपी हे पसार झाले असल्याने पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.या घटनेचा पोलीस तपास करीत असताना संजय पाटोळे याचा मर्डर आर्थिक वादातून झाला आहे का अन्य कारणातून झाला आहे याचा शोध पोलीस घेत होते. तसेच या घटनेत अजून किती जणांचा सहभाग आहे हे ही तपासले जात होते. तरबेज सुतार याचे कडे गुन्हयात वापरलेले पिस्तुल आणि त्याची काडतुसे कुठून आली याचा ही शोध घेतला जात होता. या घटनेतील संशयीत आरोपीना पकडणत सातारा एलसीबीच्या पथकाने मोलाची कामगिरी केली होती. पोलीस तपासा दरम्यान पोलीसांनी त्याचे कडुन गुन्हयात वापरलेले पिस्तुल जप्त केले होते. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, पोलीस अधिक्षक अजित बोराडे, एलसीबीचे पो.निरी.किशोर धुमाळ,पो.निरी नवनाथ मदने, पो.निरी.अरुण देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी रमेश गर्जे सपोनी राजकुमार भुजबळ, सपोनी सचिन राऊळ, फौ.गणेश वाघ, सुरज शिंदे, अनमोल कदम, वृषाली देसाई, पो.हवा. शरद बेबले, मंगेश महाडिक, प्रविण फडतारे, मुनीर मुल्ला, अमोल माने, अर्जुन शिरतोडे, निलेश काटकर, आदीनी या घटनेचा तपास करून अवघ्या १२ तासाच्या आत यातील आरोपीच्या मुसक्या आवळल्या होत्या. दोन नंबर धंदे करणाऱ्यांची गेम करायला त्याचेच प्रतिस्पर्धी टपूनच बसलेले असतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## रुग्णाचा मृत्यू अखेर प्राणावर बेतला...

लागेल. त्याला कित्येक जणांनी समजावले मात्र त्याचा डॉक्टरांना बघून घेण्याची भाषा काही बदलत नव्हती. दि. ११ फेब्रुवारी रोजी बहीणीचा विवाह असल्यामुळे डॉ. धर्मकारे रजेवर होते. मात्र दररोज ते पानटपरीवर जायचे. त्याप्रमाणे दि. ११ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजून ४८ मिनिटांनी ते उमरखेड पुसद रस्त्यावरील महाविद्यालयासमोर चहा पिण्यासाठी आले. तेव्हा शेख एफाज तेथेच होता. डॉ. धर्मकारे यांच्यावर तो पाळत ठेऊनच बसलेला होता. सामान्य स्थितीत नेहमीप्रमाणे डॉ. धर्मकारे तेथे चहा पिण्यासाठी आले होते. त्यांना काही कळण्याच्या आत एफाज त्यांच्या अगदी जवळ आला. काही कळण्याच्या आत त्याने अगदी जवळून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. अनपेक्षितपणे घडलेल्या या प्रकाराने एकच खळबळ उडाली. त्याने झाडलेल्या गोळ्यापैकी एक गोळी डॉ. धर्मकारे यांच्या छातीत तर तीन गोळ्या पाठीत घुसल्यामुळे ते जागीच कोसळले. ते बचावासाठी मदत मागू लागले. भर रस्त्यातील हा थरार पाहून कुणीही मध्ये पडले नाही. शेख एफाजचा आक्रमकपणा पाहून काही लोकांनी त्याला अडथळा करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच्याकडे रिव्हॉल्वर असल्यामुळे कोणी पुढे जाण्याचे धाडस केले नाही. दुसरीकडे डॉ. धर्मकारे यांचा खून केल्याने शेख एफाज पळून जाण्याच्या तयारीला लागला होता. त्याने जमावाच्या दिशेने दगडफेक करत घटनास्थळावरुन दुचाकीने पलायन केले. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील लोकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली, यापैकी कोणीतरी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. डॉक्टर धर्मकारे यांच्या हत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरताच उमरखेड पोलिसांचा ताफा तातडीने घटनास्थळी दाखल झाला. या घटनेनंतर जिल्हा पोलीस अधीक्षक दिलीप भुजबळ, स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक परदेशी, ठाणेदार अमोल पालवे, उपविभागीय पोलीस अधिकारी पाडवी यांच्यासह मोठा ताफा घटनास्थळावर दाखल झाला. आरोपी उमरखेडवरुन ढाकणीच्या दिशेने गेल्याचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी प्राप्त केले होते. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाला गती दिली. डॉ. धर्मकारे यांची हत्या केल्यानंतर ४ वाजून ४५ मिनिटांनी आरोपी उमरखेड येथून सुसाट वेगाने ढाकणीकडे निघाला. तो ५ वाजून ११ मिनिटांनी ढाकनी येथे पोहोचला. बारा मिनिटात त्याने हे अंतर पार केले होते. आरोपीबाबत प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली होतीच. मात्र मुख्य आरोपी शेख एफाज फरार होण्यात यशस्वी झाला. या प्रकरणाचा तपास सुरु असतांना अशी माहिती मिळाली की, या हत्याकांडामध्ये मुख्य आरोपी शेख एफाज याला त्याचे साथीदार सय्यद सय्यद खलील (३५), सय्यद मुस्ताक सय्यद खलील (३२), मोसिन शेख कयूम (३४), शाहरुख शेख आलम (३५) सर्व रा. ढाकणी यांनी मदत केली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी चौघांनाही अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. तपासादरम्यान या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार शेख एफाज शेख अनार (रा. पुसद) हाच असल्याचे निष्पन्न झाले. या संशयिताला पकडण्यासाठी महागाव, दाटी, पोफाळी, बिटरगाव या परिसरातील सर्व पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस कामाला लागले. पोलीस अधीक्षक दिलीप पाटील भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे प्रभारी परदेशी, एपीआय देशमुख, उपविभागीय अधिकारी पाडवी, पोलीस निरीक्षक पुरी, पोलीस निरीक्षक माळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी खेडेकर यांच्यासह अनेक वरीष्ठ अधिकारी तपास कामात गुंतले. पोलिसांनी सोडलेल्या खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की संशयित मध्यप्रदेशात पळून गेला आहे. या माहितीचा धागा पकडून पोलिसांचे एक पथक मध्य प्रदेशच्या दिशेने रवाना झाले. दि. ४ फेब्रुवारी २०२२ रोजी आरोपी शेख एफाज याला अटक करण्यात पोलिसांना यश आले. त्याला घेऊन पोलीस उमरखेड येथे आले, त्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. डॉ. धर्मकारे यांची हत्या कोणत्या कारणासाठी करण्यात आली याची उत्सुकता सर्वानाच होती. त्यामुळे शेख एफाज हातात आल्यामुळे हत्येचे खरे कारण समोर येणार होते. पोलिसांनी न्यायालयाकडून त्याची पोलिस कोठडी घेतली. त्यावेळी झालेल्या चौकशीत त्याने सांगितले की, दि. ४ मे २०१९ रोजी माझा भाऊ शेख अरबाज याचा अपघात झाला होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले होते. मात्र डॉ. धर्मकारे यांनी त्याच्यावर उपचार करण्यास हलगर्जीपणा केला. त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा समज झाल्यामुळे भावाचा बदला घेण्यासाठी मी डॉक्टरांचा खून केला. खून केल्यानंतर तो मोटरसायकलने पळून गेला आणि २४ दिवस पोलिसांना सापडलाच नाही. अखेर प्रयत्नांची पराकाष्ठा करत यवतमाळ पोलिसांनी आरोपीला दि. ४ फेब्रुवारी रोजी मध्यप्रदेशातून अटक केली. त्याने गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल एमएच ३ डी एन ६२६३ जप्त करण्यात आली. शेख एफाजविरुद्ध ३०२, १०९, १२० ब २१२ हत्यार कायदा तसेच अनुसूचित जाती प्रतिबंधक कायदा कलम ३, २ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सन २०१९ मधे घडलेल्या अपघात प्रकरणाचा वचपा सन २०२२ मधे काढण्यात आला. संशयीत आरोपी एफाज सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

## अल्पवयीन गुन्हेगारांचा भयानक ...

त्याच्या अल्पवयीन मित्राचा खून केल्याची कबुली दिली. संशयित विधी संघर्षीत तथा अल्पवयीन बालकाकडे केलेल्या चौकशीत त्यानेच खून केल्याचे निष्पन्न झाले. स्पीकर वाजत नसल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणाचा मनात राग धरून त्याचा मित्र करण रवींद्र गुप्ता याचा रागाच्या भरात पोटात चाकू मारून त्याचा खून केला. त्यानंतर त्याने स्वतःची कायदेशीर अटक टाळण्यासाठी पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यास वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेतले. परिमंडळ-२ वसईचे पोलीस उपआयुक्त संजयकुमार पाटील व तुळींज विभागाचे सहा.पोलीस आयुक्त पंकज शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील, पोलिस निरीक्षक मिलिंद सांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. ज्ञानेश फडतरे, पोहवा. मुकेश पवार, पोहवा. मनोज मोरे, पोना. सचिन दोरकर, पोना. किरण म्हात्रे, पोना. राजेंद्र फड, पोना. सतीश गांगुर्डे, पोअं. सूर्यकांत मुंडे, पोअं. सचिन खताळ, पोअं. जयवंत खंडवी यांनी कामगिरी पार पाडली.

## जन्मदात्या मातेमुळे मातृत्व कलंकित...

साहेबराव याच्यासोबत कट रचून मुलगा सार्थक याचा खून केल्याचे चौकशी व तपासात निष्पन्न झाले. मात्र साहेबराव याचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. सार्थक याला आपण साहेबरावच्या मोटारसायकलवर बसवले. त्यानंतर काही वेळातच काम झाले म्हणून साहेबरावने तिला फोन करुन सांगितले. संगिता व साहेबराव यांचे गेल्या वर्षभरापासून अनैतिक संबंध होते. संगिताचा पती रमेश बागुल हा खासगी वाहनावर क्लीनर म्हणून काम करतो. दहा फेब्रुवारी रोजी तो बाहेरगावी गेला होता. याच रात्री तिच्या घरी साहेबराव आला. दरम्यान रात्री अकरा वाजेच्या सुमारास सार्थक झोपेतुन जागा झाला. यावेळी त्याने आई व साहेबराव यांना सोबत पाहून घेतले. मात्र संगीता हिने परत त्याला झोपी घालून ती व साहेबराव दुसऱ्या एका खोलीत गेले. या रात्री त्याने संगीता हिला 'तुझा नवरा मुंबईहून कधी परतणार? सार्थक याने आपण रात्री सोबत होतो याबाबत कुणाला सांगितले तर काय होणार? याबाबत चर्चा केली. सार्थकने रात्री आई व साहेबराव यांना सोबत पाहिले व आता त्याने याबाबत कुणाकडेही वाच्यता केली तर आपली बदनामी होईल या भीतीने प्रियकराने संगीता सोबत संगनमत करत दुसऱ्या दिवशी सार्थकला मोटारसायकलने तलवाडा घाटात नेले. मात्र गावात साडी परिधान करुन आलेल्या तिघांनीच सार्थकला पळवून नेल्याची आवई संगीताने सर्वत्र उडवली. त्यामुळे गुन्ह्याचा तपास करतांना पोलीस तपासात अडचणी येत होत्या. मात्र सार्थकचा मृतदेह सापडल्यानंतर गुन्ह्याचा उलगडा झाला. सार्थकच्या खुनाचा उलगडा झाल्याने संगीता ही गजाआड झाली. तर साहेबराव याने विषारी औषध घेत स्वतःचा अंत करुन घेतला. निष्पाप चिमुकल्याचा खून करणाऱ्या संगिताच्या प्रियकराने स्वतःचा अंत स्वतःच करुन घेतला.

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : १० | सोमवार दि. २८ फेब्रुवारी २०२२ ते रविवार दि. ०६ मार्च २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## भाजी मार्केटवाल्या गुन्हेगाराचा भरदुपारी घात झाला चार गोळ्या लागताच ढगात जाण्याचा 'समय' आला



मयत समय चौहान

विरार/लक्ष्मणराव पाटोळे

वसई, विरार, नालासोपारा परिसरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी नवे पोलीस आयुक्तालय झाले, तरीसुद्धा या भागातील गुन्हेगारी आटोक्यात आलेली नाही. कारण केवळ पोलीस ठाणी वाढवून किंवा नवे पोलीस मुख्यालय बनवून गुन्हेगारी आटोक्यात येणार नाही, तर इथली गुन्हेगारी आणि गुन्हेगार का वाढत आहेत याचा पोलीस किंवा पालिका प्रशासनाने कधी विचारच केला नाही. राहता राहिला सवाल लोकप्रतिनिधींचा तर बरेचसे लोकप्रतिनिधी बांधकाम व्यावसायिक असल्याने जमिनीच्या वादातून इथे बराच खून खराब झालेला आहे. आतापर्यंत फक्त अनधिकृत बांधकामे आणि त्यासाठी लागणाऱ्या जागा बळकावण्याच्या कारणावरूनच या भागात खून खराब व्हायचा, पण आता मोकळ्या जागांवर भरवले जाणारे बेकायदेशीर भाजीपाला बाजार सुद्धा खून खराब्याचे कारण बनू लागले आहेत. कारण कुणीही भाई उभा राहतो आणि मोकळ्या जागेवर बेकायदेशीर बाजार भरवतो. अशा अशा बाजारांना पालिका किंवा पोलिसांची परवानगी नसते. तसेच जागेवरून हाणामाऱ्या सुद्धा होतात आणि आता तर विरार पूर्व येथील संतनगर जवळ डी मार्ट समोर भरवल्या जाणाऱ्या भाजी बाजाराच्या फुटपाथवर समय चौहान नावाच्या हा बाजार भरविणाऱ्याची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या करण्यात आली. दोन गंभीर गुन्ह्यांची नोंद असलेल्या आणि तुरुंगातून शिक्षा भोगून आलेला असा एक गुन्हेगार मोकळ्या जागेवर भाजीपाला बाजार भरवतो आणि पोलीस व पालिका त्याच्यावर कोणतीही कारवाई करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. शनिवारी दुपारी १.३५च्या सुमारास मोटार सायकलवरून आलेल्या दोघांनी त्याला गोळ्या घातल्या आता हि हत्या पूर्ववैमन्यस्यातून झाली आहे कि व्यावसायिक कारणातून झाली आहे हे तपासात निष्पन्न होईलच, पण अशा प्रकारचे बेकायदेशीर बाजार आता गंभीर गुन्ह्याचे हॉटस्पॉट बनू लागले आहेत. आणि याला पोलीस आणि पालिका प्रशासन जबाबदार आहे. कारण मोकळ्या जागांवर असे बाजार भरतातच कसे? पालिका आणि पोलीस काय झोपलेले असतात. कारण हे बाजार भरवणारे नंतर याच मोकळ्या जागांचा ताबा घेऊनपुढे तिथे अनधिकृत बांधकामे करण्याची शक्यता असते. त्यामुळे चंदनसार किंवा विरारच्या अन्य मोकळ्या मैदानात भाजी बाजार भरवणाऱ्या गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांवर पोलीस आणि पालिकेने कारवाई करायला हवी अशी मागणी आता वसई विरारची जनता करीत आहे.



शनिवारी दुपारी १.३५ च्या दरम्यान विरार पुर्व येथील ९० फिट रस्त्यावर डि मार्ट समोर असलेल्या आणि मोकळ्या जागेत भरवलेल्या भाजीपाला बाजारा जवळील फर्निचरच्या दुकानासमोर समय चौहान हा आपल्या कारमधून घराकडे जाण्यासाठी निघाला होता. त्याचवेळी मोटार सायकलवरून दोन अनोळखी इसम तिथे आले आणि त्यांनी अगदी जवळून समय चौहान याच्यावर चार राऊंड गोळीबार केला. यातील एक गोळी त्याच्या डोक्यात तर एक छातीला लागली आणि तो जखमी होऊन खाली कोसळला. तर हल्लेखोर गोळीबार करून नालासोपाराच्या दिशेने पळून गेले. दरम्यान जखमी समय चौहान याला नालासोपाराच्या अलायन्स रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र तिथे त्याचा उपचार पूर्वीच मृत्यू झाला होता. या घटनेमुळे विरारमध्ये मोठी खळबळ माजली असून विरार पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात हल्लेखोरांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. समय चौहान याने भाड्याने हि मोकळी जागा घेऊन इथे बाजार भरवला होता. छोटे छोटे स्टॉल टाकून ते भाड्याने दिले होते. मात्र त्यासाठी कोणतीही प्रकारची ...पान ६ वर

### एफआयआरमध्ये बड्या नेत्याचे नाव

**समय चौहान याच्या हत्या प्रकरणात विरार पोलिसांनी गु.र.क्रमांक ०२३२/२०२२ कलम ३०२, १२०ब, ३२५, २७ अन्वये गुन्हा दाखल केला असून या एफआयआरमध्ये विरारमधील एका बड्या नेत्यांसह ८ जणांची नावे आहेत, तर या प्रकरणी चार जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या गुन्ह्याचा तपास विरार पोलीस करीत आहेत.**

## व्याभिचारी मुलीचे लफडे उघडकीस आले आईच्या मदतीने तिने बापालाच ठार केले

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत शांतीनाथ

**कोणत्याही कुटुंब प्रमुखाला घरात सुखशांती असावी असे वाटत असते. दिवसभर कामधंदा करून घरी आल्यावर दोन घास सुखाचे खाऊन शांत झोपावे एवढीच त्याची माफक अपेक्षा असते. अशावेळी पत्नी किंवा मुलगी जर व्यभिचारी निघाली तर समाजात तोंड दाखवणे अवघड बनते आणि त्यातून वाद सुरू होतात. इचलकरंजी येथील विकासनगरमध्ये राहणारे शांतीनाथ केटकाळे हे साधे असल्याने कुटुंब सुखात होते. मात्र त्यांची पत्नी आणि मुलीचे बाहेर अनैतिक संबंध असल्याचे समजताच घरात भांडणे होऊ लागली आणि एकेदिवशी अशाच भांडणात मायलेकींनी शांतीनाथ यांच्यावर चाकूचे वार करून त्यांची हत्या केली आणि पोलीस ठाण्यात हजर झाल्या. या घटनेने संपूर्ण इचलकरंजी शहर हादरले आहे.**



आरोपी सुजाता



आरोपी साक्षी

अहिंसा परमो धर्म की जय या आचरणाप्रमाणे वागत राहत शांतीनाथ केटकाळे हे आपल्या जीवनात वाटचाल करीत होते. घरची शेतीचा उदयोग सांभाळत होते. त्याचबरोबर मुली मोठया झाल्याने त्यांनी कौटुबिंक जबाबदारी ओळखून बर्गे मळ्यातील घरात किवी मार्ट म्हणून किराणा दुकानाची शॉपी टाकली होती. त्यामुळे त्याच्या हातात नेहमी पैसा खेळत होता. घरची परिस्थीती ही सधन असल्याने कशाचीच कमतरता नव्हती. तरी ही घर तेथे भांडण असते त्याप्रमाणे त्याच्या ही घरात हा पत्नी सुजाता बरोबर कलह होत होता. ज्या घरात भांडणे असतात याला कारण म्हणजे तिचे बाहेरचे अफेयर होते. ती त्या पुरूषाबरोबर बिनधास्त वागत होती. त्याचे बरोबर ती संबंध ठेवत होती. ज्या घरात भांडणे असतात त्या घरात लक्ष्मी कधी ही नांदत नाही असे म्हणातात त्या प्रमाणे त्याच्या ही घरात चालू होते. कितीही पैसा मिळविला तरी तो टिकत नव्हता. पत्नी सुजाताचा स्वभाव तसा भांडखोर होता. तिचे सासूशी कधीचच पटत नव्हते. कारण तिच्या सासूने ही तिच्या बाहेरख्याली संबंधाला विरोध केला होता या कारणातून घरात कलह सुरू होता. शांतीनाथ याची आई ही वयोवृध्द होती. तिला आपल्या सुनेचे सगळे चाळे माहित झालेले होते. ती आपल्या मुलग्याला आणि घराला कधीच सुख लागू देणार नाही हे तिने ओळखले होते. त्यांना ही सुनेचा बाहेरख्याली स्वभाव माहित असल्याने खरे त्या पडती बाजू घेऊन गप्प राहत होत्या. पण भांडण होऊन...पान २ वर

## दारूच्या पार्टीतच अचूक साधला नेम ५ लाखांसाठी केला मटका किंगचा गेम



सातारा/क्राईम रिपोर्टर

**कर्जाची रक्कम वेळेवर दिली नाही, तर कर्ज देणारा एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाही. त्यातच जर कर्ज देणारा आणि घेणार दोघेही गुन्हेगारी क्षेत्रातले असले तर मग त्यांच्यासाठी एकमेकांचा जीव घेणे कठीण नसते. मटक्याचा धंदा करणाऱ्या दोन धंदेवाल्यांमध्ये असाच पाच लाखांवरून वाद होता. संजय पाटोळे या मटका किंगने तरबेज सुतार याच्याकडून पाच लाख घेतले होते. मात्र ते पैसे तो परत करीत नव्हता. त्यामुळे सुतार याने आपल्या साथीदारांच्या मदतीने मटका किंग पाटोळे याची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी शिरवळ पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

दोन नंबरच्या धंदयात फायदा जास्त असला तरी या धंद्यात दोस्त कम दुश्मन जादा होते है अशी स्थिीती असते. तरीही अनेजणांचा या धंदयाकडे जास्त ओढा असतो.सध्या महाराष्ट्रात कल्याण मुंबई मटका हा जरी वर करणी बंद असला तरी तो छुप्पा पध्दतीने जोरात चालू आहे.अनेक लहान मोठे मटकेवाले यातून गब्बर झालेत. खेळणारा मात्र या धंदयात भिकारी होतो. कारण खेळणाऱ्याचे एक घर असते तर मटका घेणाऱ्याची ९९ घरे असतात. त्यामुळे मटका खेळणारे अनेकजण घरा दाराला मुकले आहेत तर मटका घेणारे गडंगज झाले आहेत. चिठीचा हा व्यवसाय जितक्या ...पान २ वर

## रुग्णाचा मृत्यू अखेर प्राणावर बेतला डॉक्टरला ठार मारून भावाने सूड घेतला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर



मयत डॉ. धर्मकारे

**रुग्णांचा जीव वाचवणाऱ्या डॉक्टरला लोक साक्षात देवदूत समजतात आणि डॉक्टरही त्यांच्याकडे उपचारासाठी गेलेल्या प्रत्येक रुग्णाला बरे करण्याचा प्रयत्न करतात. पण जीवन आणि मरण हे काही माणसाच्या हाती नसते आणि डॉक्टर हा सुद्धा शेवटी माणूसच असतो. त्यामुळे उपचार दरम्यान कधी कधी एखाद्या पेशंटचा जीव गेला, तर पेशंटचे नातेवाईक डॉक्टरला जबाबदार धरतात. त्यांना मारहाण करतात. उमरखेड येथे उपचाराच्या दरम्यान अशाच एका रुग्णाचा मृत्यू झाला होता. मात्र त्याच्या चिडलेल्या भावाला डॉक्टरमुळेच आपल्या भावाचा जीव गेला असे वाटत होते आणि तोच राग मनात धरून त्याने तीन वर्षांनी डॉक्टरचा खून करून सूड घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**





मुळचे नांदेड येथील डॉ. हनुमंत धर्मकारे उमरखेड येथे स्थायिक झाले होते. आर. पी. उत्तरवार कुटीर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून ते सेवा बजावत होते. या रुग्णालयातील कामकाजाव्यतिरिक्त ते आपल्या खासगी दवाखान्यात देखील रुग्णसेवा करत होते. ४ मे २०१९ रोजी त्यांच्या दवाखान्यात अपघातात जखमी झालेला एक रुग्ण दाखल झाला. शेख अरबाज असे त्या रुग्णाचे नाव होते. शर्थीच्या उपचारादरम्यान शेख अरबाज याचे दुर्दैवी निधन झाले. डॉ. हनुमंत धर्मकारे यांच्या बेजबबदारपणामुळेच शेख अरबाज याचा मृत्यु झाला असा समज त्याचा भाऊ शेख एफाज शेख अबरार याने मनाशी करुन घेतला. तेव्हापासून डॉक्टरांचा बदला घेण्याचे त्याने मनाशी निश्चित केले होते. त्या दिवसानंतर त्याने एके दिवशी गावठी कट्टा विकत घेतला होता. तो सतत डॉ. धर्मकारे यांच्या मागावरच रहात होता. अवघ्या बावीस वर्षाच्या शेख एफाज याच्या मनात डॉ. धर्मकारे यांच्याबद्दल निर्माण झालेली चिड काही केल्या मनातून जाण्यास तयार नव्हती. त्याचा अशिक्षितपणा आणि हेकेखोरपणा हे त्यामागचे मुख्य कारण म्हणावे ...पान २ वर

## अल्पवयीन गुन्हेगारांचा भयानक थरार मुलाने केले १६ वर्षाच्या मुलाला ठार

वसई/क्राईम रिपोर्टर

**मुलांना लहान वयात जर चांगले वळण लागले नाही. त्यांच्यावर चांगले संस्कार झाले नाहीत त्यांना चांगले शिक्षण मिळाले नाही, तर अशी मुले वाया जातात आणि मग बालवयातच त्यांची पावले गुन्हेगारीकडे वळतात. त्यातच सिनेमात दाखवलेल्या भाईगिरीचा त्यांच्यावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे मुले गुन्हेगारीच्या मार्गाकडे वळतात. वालिव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वालशेतपाडा येथे शुल्लक कारणांवरून दोन अल्पवयीन मुलांमध्ये वाद होता आणि याच वादातून एकाने दुसऱ्याची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी आरोपी अल्पवयीन मुलाला वालीव पोलिसांनी अटक केली आहे.**

वालीव पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात वावशेतपाडा येथे मंगळवारी (दि.२२) रात्री साडेसात वाजताच्या सुमारास एका अल्पवयीन मुलाच्या पोटात चाकू मारून त्याचा खून केल्याच्या प्रकाराने परिसरात खळबळ माजली होती. याबाबत वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २१०/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वालीव ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला तपासाच्या सूचना केला होत्या. वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व आमदारांनी गुप्त माहिती प्राप्त करुन अल्पवयीन मित्रास विनाविलंब ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता स्पीकर वाजवण्याच्या कारणावरून त्यानेच ...पान २ वर

## जन्मदात्या मातेमुळे मातृत्व कलंकित झाले प्रियकरासाठी पोटच्या पोरालाच ठार केले

औरंगाबाद (वैजापूर)/क्राईम रिपोर्टर



**आजकाल समाजात व्यभिचार इतका बळावला आहे कि वासनेच्या भरात स्त्री असो कि पुरुष रक्ताच्या नात्याचाही विचार करीत नाहीत. अनैतिक संबंधाच्या आड येणारा कुणीही असो त्याला निष्ठुरपणे संपवले जाते. वैजापूर तालुक्यातील खंडाला येथे विवाहितेने आपल्या अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या ९ वर्षाच्या मुलाला प्रियकराच्या मदतीने ठार मारले. ज्याला नऊ महिने उदरात वाढवले ज्याचे प्रेमाने संगोपन केले अशा पोटच्या पोराला प्रियकराच्या मदतीने ठार मारणाऱ्या या कैदाशीण मातेला अटक केली आहे.**

अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या नऊ वर्षाच्या पोटच्या गोळ्याचा आईनेच प्रियकरासोबत कट रचून खून केल्याची खळबळजनक घटना १८ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. सार्थक रमेश बागुल (९) रा. खंडाळा असे हत्या झालेल्या बालकाचे नाव आहे. नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटनेतील आई संगीता रमेश बागुल (रा. खंडाळा) हिला न्यायालयाने सुरुवातीला चार दिवस पोलीस कोठडी सुनावली. विषारी द्रव्य प्राशन केलेला प्रियकर साहेबराव माणिकराव पवार (५६), रा.खंडाळा याचा शनिवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. हत्या झालेला सार्थक बागुल हा ११ फेबुवारीपासून बेपत्ता झाल्याची खबर त्याची आई संगीता हिने पोलीसात दिली होती. प्राथमिक चौकशीत मुलगा सार्थक हा सकाळी अकरा वाजता घराबाहेर पडला त्यापुढे काहीही माहित नसल्याचे त्याची आई संगिता सांगत होती. मात्र तलवाडा घाटात अनोळखी मृतदेह सापडल्याने वैजापूर पोलीसांनी संगीता व तिचा पती रमेश बागुल यांना घटनास्थळी नेऊन त्याचे कपडे व सँडल यावरुन त्याची ओळख पटवली. मात्र मुलाचा खून झाल्यानंतरही आईच्या चेहऱ्यावर विशेष दुःख जाणवत नव्हते तर गावातील साहेबराव याच्याशी तिचे अनैतिक संबंध असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. मात्र त्याने विषारी औषध प्राशन केल्याने त्याच्या कुटुंबियांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असल्याचे पोलिसांना समजले.

दरम्यान संगिताची उलट चौकशी केली असता तिने प्रियकर ...पान २ वर

## रक्ताचे नाते अखेर रक्तरंजित ठरले दारूसाठी भावाने भावाला ठार मारले

नांदेड/क्राईम रिपोर्टर

**दारूच्या आहारी गेलेला माणूस कुटुंबासाठी मनस्ताप असतो. कारण एकीकडे दारूच्या नशेत तो घरात आणि घराबाहेरही कुणाशीही भांडणे करीत असतो आणि त्याचा त्रास कुटुंबाला भोगावा लागतो. तर दुसरीकडे दारुडा माणूस कामधंदा करीत नाही. उलट दारूसाठी घरात पैसे मागून तमाशा करीत असतो. नांदेडमध्ये अशाच एका दारुड्याने दारूसाठी पैसे दिले नाहीत म्हणून आपल्या धाकट्या भावाची हत्या केली. या प्रकरणी मयात तरुणाच्या आईच्या फिर्यादीवरून आरोपी भावाला अटक करण्यात आली आहे.**

नांदेड शहरातील चिरागगल्ली परिसरात हत्येची एक थरारक घटना उघडकीस आली आहे. येथील एका तरुणानं आपल्या धाकट्या भावाची निर्घृण हत्या केली आहे. नराधम आरोपीनं लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत लहान भावाचा जीव घेतला आहे. हत्येची ही थरारक घटना उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून आरोपी भावाला अटक केली आहे. या घटनेचा पुढील तपास इतवारा पोलीस करत आहेत. अरुणसिंह बालाजीसिंह ठाकूर असं हत्या झालेल्या तरुणाचं नाव असून तो नांदेड शहरातील चिरागगल्ली परिसरातील रहिवासी होता. तर जुगनूसिंह ठाकूर असं मारेकरी भावाचं नाव आहे. या प्रकरणी इतवारा पोलिसांनी आई गंगाबाई ठाकूर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. आरोपी तरुणाला अटक ...पान ६ वर

# जागतिक विश्वासघात!

मोठ्या लोकांवर सहसा कुणी विश्वास ठेऊ नये. कारण ते लोक जे काही करतात त्यात अगोदर आपल्या फायद्या तोट्याचा हिशोब लावतात आणि नंतरच आपली भूमिका ठरवतात. फायदा असेल तरच एखाद्या भानगडीत पडतात नायतर किती जरी जवळचा मित्र असला तरी त्याला फक्त सल्ले देण्याशिवाय काहीही करीत नाहीत आणि त्यांच्या सल्ल्याने जो कुणी जाईल तो खड्ड्यात पडून मेला म्हणून समजा! आज युक्रेनची हीच अवस्था झाली आहे. युक्रेनने अमेरिका आणि नाटोच्या भरवशावर रशियाशी पंगा घेतला आणि आता दोघांनीही हात वर केल्यामुळे युद्धाच्या आगीत फक्त युक्रेन जळतोय. मात्र काहीही झाले तरी अमेरिका आणि नाटो यात पडावेच लागेल. त्यामुळे तिसरे महायुद्ध अटळ आहे. साम्राज्य विस्ताराच्या ध्यासाने पछाडलेल्या महा सत्ता जगाला शांततेने जगायला देणार नाहीत असे आता वाटायला लागले आहे. कारण एकीकडे रशियाने युक्रेंनशी युद्ध छेडले आहे, तर दुसरीकडे चीन तैवानांचा घास घ्यायला तापला आहे. अशा स्थितीत अमेरिका दोन्ही प्रकरणात छोट्या राष्ट्रांच्या बाजूने उभी आहे. कदाचित त्यामुळेच चीन तैवानवर हल्ला करायला घाबरत आहे, पण रशियाने मात्र जगाच्या विरोधाची पर्वा न करता युक्रेनच्या दोन प्रातांना स्वतंत्र देश म्हणून घोषित करून थेट युक्रेंनवर लष्करी कारवाई सुरू केली आहे. त्यामुळे अमेरिकेसह सर्व युरोपियन देश रशियाच्या विरोधात एकवटणार आहेत आणि त्यामुळे जगात तिसऱ्या महायुद्धाचा भडका उडण्याची शक्यता आहे. कोरोनाने गेल्या दीड वर्षात संपूर्ण जगाचं आर्थिक कंबरडे मोडून टाकले आहे अशा स्थितीत युद्ध कुणालाच नकोय. छोटे देश तसेच भारतासारख्या विकसनशील देश जगात सतत शांतीची कबुतरे उडवत आहेत, तर दुसरीकडे रशिया, चीन आणि अमेरिकेसारख्या महासत्ता या शांतीच्या कबुतरांची गोळ्या घालून शिकार करीत आहेत. त्यामुळेच जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की रशिया, नाटो किंवा सुरक्षा परिषदेचे निर्णय मानायला तयार नाही अशा स्थितीत सर्वांनी एकत्र येऊन रशियाची मुजोरी मोडून काढणे हा एकमेव उपाय आहे. तसे झाले तर दुसऱ्या महायुध्दात जी हालत हिटलरची झाली तीच हलत पुतींची होऊ शकते. तसे पाहता युक्रेन हा रशियाचाच एक भाग होता, पण रशियाच्या विभाजन झाल्यावर युक्रेन वेगळा झाला आणि पाश्चिमात्य देशांशी उक्रेंची सलगी वाडली आणि हेच रशियाच्या पोटदुखीचा मुल कारण आहे. साम्राज्यवादी देशांनी त्यांच्या ताब्यातील छोट्या देशांना जरी स्वातंत्र्य दिले तरी त्यांनी स्वातंत्र्यानंतरही आपले गुलाम बनून राहावे अशी रशिया सारख्या महा सत्तांची अपेक्षा असते. पण तसे होत नाही. स्वातंत्र्य म्हणजे गुलामीतून मुक्तता! मग स्वातंत्र्य झालेल्या देशांनी महासात्तांची गुलामी का पत्करावी? पण चीन, रशिया, अमेरिका यांच्यासारख्या साम्राज्यवादी महासत्तांना हे मान्य नाही. अर्ध्या जगावर आपली हुकूमत असावी हे एकच धोरण नजरेसमोर ठेऊन चालणाऱ्या या महासत्ता जगात शांततेने जगू पाहणाऱ्या प्रत्येक माणसाच्या समोर एक महासंकट बनून उभ्या राहत आहेत आणि याच भीतीतून इस्लामी दहशतवादाचा जन्म झाला. जर रशिया-अमेरिकेसारख्या महासत्ता वाढल्या तर त्या इस्लामला दाबून टाकतील नेस्तनाबूत करून टाकतील. या भीतीपोटी जगातले सर्व इस्लामी दहशतवादी संघटना अमेरिकेच्या विरोधात आहेत. रशियाला जरी त्यांचा थेट विरोध नसला तरी रशिया बरोबर त्यांचे तितकेसे चांगले संबंध नाही. या सर्व पार्श्वभूमीवर जी महासत्तांची दडपशाही सुरू आहे ती जगात अशांतता माजवणारी आहे. त्यामुळे या महासत्ता बाबत जगणे काहीतरी निर्णय घ्यायलाच हवा. कारण रशिया नाटोचे एकयला तयार नाही. सुरक्षा परिषदेच्या ठरवला केराची टोपली दाखवतोय आणि संपूर्ण युरोपचा रोष पत्करून युक्रेंनवर हल्ला करतोय ही तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात आहे. जर तिसरे महायुद्ध झाले तर त्यात अर्थातच अण्वस्त्रे आणि जैविक अस्त्रांचा वापर केला जाईल आणि तो जगाच्या अस्तित्वासाठी घातक ठरेल. दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने जपानवर दोन अणुबॉम्ब टाकले, त्याचे भयानक परिणाम आज ८० वर्षानंतरही जपानी लोक भोगत आहेत आणि आता तर परिस्थिती बदलली आहे. रशिया-अमेरिकेकडे ५ हजार किमीपर्यंत मारा करणारी भयानक क्षेपणास्त्रे आहेत. अशावेळी युद्धाची तीव्रता किती भयंकर असू शकेल याची कल्पनाही करता येत नाही. रशियाने युरोपचा रोष पत्करून युक्रेंनवर हल्ला केलाय, अशा वेळी अमेरिका आणि इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी सारखे देश युक्रेनच्या बाजूने उभे राहणार तर रशियाला चीनची मदत आहे. त्यामुळे हे महा युद्ध रशिया विरुद्ध युक्रेन असे न राहता युरोप विरुद्ध आशिया अशा दोन खंडांमध्ये लढले जाईल. त्यामुळे यात भारत अथवा आशिया खंडातील इतर देश असोत अथवा नसोत युरोपियन राष्ट्रांच्या तिखट माऱ्याच्या टप्प्यात आशिया खंडातले बहुतेक देश येतील आणि त्यांचेही मोठे नुकसान होईल. उदाहरणार्थ चीनवर अमेरिका किंवा युरोपियन राष्ट्रांनी जैविक अस्त्रांचा किंवा अण्वस्त्रांचा मारा केला तर चीनच्या शेजारी असलेल्या भारताला किंवा नेपाळ अथवा पाकिस्तानलाही या हल्ल्याचे नुकसान सोसावे लागणार आणि मग इच्छा नसतानाही या महायुध्दात त्यांना भाग घ्यावा लागणार आणि महायुध्दात अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळेच महायुद्ध टाळायला हवे. पण आजची परिस्थिती पाहता तसे होताना दिसत नाही. त्यामुळे जगासमोर पुढे काय वाढून ठेवले आहे आणि त्याचे परिणाम पुढे काय होणार आहेत, याच्या कल्पनाही अंगावर काटा येतोय.

# सोशल मीडिया, सायबर गुन्हे आणि आपण!

**दिशायन**

सध्या डिजिटल इंडिया संकल्पनेतून सुरू झालेले कॅशलेस व्यवहार आणि सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे ऑनलाइन गुन्हे वाढू लागले आहेत, ओळख लपवून इंटरनेटवर गंभीर गुन्हे सहज करता येतात. पासवर्ड हॅक करून ऑनलाईन बँकिंग आणि जॉब फ्रॉड, लॉटरी, एटीएम स्कीमिंग, नायजेरियन फ्रॉडसारखे ऑनलाईन आर्थिक फसवणुकीचे गुन्हे, सोशल नेटवर्किंग साईट्सच्या माध्यमातून देव-देवता, महापुरुषांचे विडंबन, महिलांचे बनावट प्रोफाईल तयार करणे, मॉर्फिंग, अश्लील फोटो वेबसाईट्सवर टाकणे अशा गुन्ह्यांचा तपास करणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. फेसबुक, ट्विटर, लिंक्ड इन, व्हॉट्सऍपसारख्या सोशल मीडियावर देवी-देवता व महापुरुषांसंबंधी बदनामीकारक मजकूर टाकल्याने सामाजिक शांतता धोक्यात येत आहे. यासंबंधीतच सायबर नेट, सायबर क्राईम, सायबर सिक्युरिटी असे शब्द आपण सर्रास ऐकतो. पण, याबाबींची तीव्रता आपल्याला माहिती नसते. त्याच बाबींवर आपण प्रकाश टाकणार आहोत.

सायबर सिक्युरिटी : संगणकावर होणारा गुपचूप हल्ला किंवा अनधिकृत घटकांकडून झालेली संगणकप्रणालीची अतोनात हानी आणि त्याचेच संरक्षण म्हणजे सायबर सेक्युरिटी (Cyber Security) होय.

सायबर गुन्हा : सायबर गुन्हा हा पारंपारिक गुन्ह्याप्रमाणेच असतो फक्त तो सायबर स्पेसमध्ये इलेक्ट्रॉनिक व संगणकीय वातावरणात केलेला असतो. म्हणून त्याला सायबर गुन्हा (Cyber Crime) म्हणतात.

**: सायबर गुन्ह्यांचे प्रकार :**

सॉफ्टवेअर पायरसी (सॉफ्टवेअरची चाचेगिरी) : संगणक वापरासाठी संगणकासाठी तयार केलेले कायदेशीर सॉफ्ट्वेअर म्हणजेच लायसन्स सॉफ्ट्वेअर वापरावयाचे असते. परंतु काहीजण अशी लायसेन्स सॉफ्टवेअर वापरत नाहीत. बेकायदेशीरपणे सॉफ्ट्वेअरची कॉपी करून वापरण्यास सॉफ्ट्वेअरची चाचेगिरी म्हणतात. कॉपी केलेल्या सॉफ्ट्वेअरला पायरेटेड सॉफ्ट्वेअर म्हणतात.



हॅकिंग : हॅकिंग म्हणजे नियमांचे उल्लंघन करणे अथवा बेकायदेशीर पध्दतीचा अवलंब करणे. सायबर गुन्ह्यामध्ये संगणाक, संगणक नेटवर्क अथवा वेबसाईटची सुरक्षितता भेदणे व त्यामधील माहिती बदलणे, चोरणे किंवा संगणक प्रणाली खराब करुन त्यामध्ये बिघाड करणे, याला हॅकिंग म्हणतात.

सायबर स्टॉकिंग : यामध्ये एखाद्याची माहिती मिळवून त्याला धमक्या देऊन व मेल पाठवून जेरेस आणतात. फोन करुनही त्रास देतात.

डिनायल ऑफ सर्व्हिस अटॅक : (सुविधा नादुरुस्त करणे) यामध्ये नेटवर्कची सुविधा बंद करण्यासाठी नेटवर्कची बॅन्ड विड्थ फ्लड करतात. असंख्य व फार मोठे मेल पाठवून (स्मॅम मेल) मेल बॉक्स भरुन टाकतात. यामुळे नेटवर्कमधील ट्रॅफिक जॅम होते व कम्युनिकेशन थांबते.

व्हायरस डेसीमिनेशन : व्हायरस म्हणजे संगणकबाह्य सूचना संगणाकात प्रवेश करुन बिघाड करतात, माहितीची नासधूस करतात. अशा संगणक प्रोग्रॅमला व्हायरस म्हणतात. हे प्रोग्राम संगणक प्रणाली दूषित करून हेतूपूर्ण नुकसान घडवतात.

आय.आर.सी.क्राईम (IRC Crime Internet Realy Chat): इंटरनेटवर सध्या चॅटरूम उपलब्ध आहेत. यामध्ये चॅट करणारी व्यक्ती खोटी माहिती सांगून दुसऱ्याला फसवू शकते. अशा चॅटरुममध्ये खोटी माहिती देऊन इतरांना फसविण्याचे प्रकार वाढले आहेत. या गुन्हेगारीला आय.आर.सी.क्राईम असे म्हणतात.

क्रेडीट कार्ड फ्रॉड : यामध्ये क्रेडीट कार्डचा बेकायदेशीर वापर करुन खरेदी करण्याचे गुन्हे केले जातात.

नेट एक्स्ट्रॉरशन : कंपनीचा गोपनीय व महत्त्वाचा डाटा चोरी करुन त्यापासून पैसे मिळविले जातात किंवा कंपनीकडूनच पैसे मागितले जातात.

पिशिंग (Phishing) : यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे मेल पाठवतात व लोकांची पर्सनल माहिती मिळवतात. अनावधानाने मेलला उत्तर देताना बॅंक अकाऊंट नंबर, पासवर्ड पाठवला जातो. नंतर गैरवापर करतात.

चाईल्ड पोर्नोग्राफी : लहान मुलांना फसवून त्यांना बीभत्स चित्र, वाडमय, चित्रफित पाठविल्या जातात. यामध्ये लहान मुलांचे मेल एॅड्रेस मिळवितात. चॅटमध्ये खोटी माहिती सांगून त्यांचा विश्वास संपादन करतात. त्यांना मेलद्वारे बीभत्स गोष्टी दाखवून समाजामध्ये सगळे असेच करतात असे त्या मुलाला सांगून त्याची पूर्ण फसवणूक करतात. त्याचा विश्वास बसल्यानंतर त्याला घराबाहेर भेटण्यास सांगतात. अशा भेटीमध्ये मुलांचा आणखी विश्वास संपादन करुन त्याच्याकडून अनैतिक लैंगिक गोष्टी करवून घेतात.

**: प्रतिबंधात्मक उपाय :**

१) सोशल मीडियावर फेसबुक, ट्विटरसारख्या संकेतस्थळांवर कोणत्याही नेत्याच्या, धर्माच्या किंवा इतर संवेदनशील बाबींवर आपत्तीजनक पोस्ट/कमेंट करू नका. याने सामाजिक सलोखा बिघडतोच पण भादंवि कलमनुसार तुम्ही तुरुंगात जावू शकता व दंडात्मक कारवाईसुद्धा होऊ शकते.

२) कॅशलेस व्यवहारांमुळे सातत्याने वापरत येणारे payटीएम, भीम सारख्या ॲप्लिकेशन वापरत असताना पासवर्ड दुसऱ्यांना समजणार नाही याची काळजी स्वतच घ्यायची आहे.

३) तुम्ही एखाद्याचे नक्कल करणारे बनावट आयडी बनवून त्या व्यक्तीचे नक्कल करणारे किंवा आक्षेपार्ह पोस्ट सतत टाकले व मूळ व्यक्तीने सायबर विभागाकडे तक्रार केली तर तुमच्यावर कारवाई होऊ शकते म्हणून अशा बाबी आपण कटाक्षाने टाळाव्यात.

४) आर्थिक व्यवहार सायबर कॅफेमधून किंवा दुसऱ्याच्या संगणकावरून करू नका.

५) अनोळखी संकेतस्थळांना भेटी देण्याचे टाळा.

६) चॅट करताना कुठलीही महत्त्वाची माहिती टाइप करू नका. वेब कॅमेरा काम झाल्यावर बंद करा किंवा झाकून ठेवा.

७) संगणक वापरताना जागरूक राहा. अनोळखी व अनावश्यक गेम्स व प्रोग्रॅम लोड करू नका.

८) स्पायवेअर व वायरस यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तुमच्या कॉम्प्युटरमध्ये चांगला अँटी व्हायरस आणि अँटी स्पायवेअर प्रोग्रॅम बसवून घ्या.

९) दर दोन किंवा तीन दिवसांनी संगणकाच्या वापरामुळे जमा झालेली तात्पुरती डाउनलोडेड माहिती व जुनी वेब पेजेस कायमस्वरूपी काढून टाकत चला.

१०) पासवर्ड असे ठेवा की जे सहज ओळखायला कठीण राहतील.

११) ज्या वेबसाईटच्या माध्यमातून पेमेंट करावयाचे आहे, तिची सुरक्षाव्यवस्था तपासा.

१२) फोन क्रेडीट/ डेबीट कार्ड व ई-बॅकिंगची माहिती अनोळखी लोकांना देऊ नका.

१३) डेबीट/ क्रेडीट कार्ड गहाळ झाल्यास ते रद्द करण्यासाठी तात्काळ अर्ज करा व संबंधित संस्थेला त्याची माहिती द्या.

१४) काही ई-मेल अनोळखी व्यक्ती अथवा संस्थाकडून येतात. ते काळजीपूर्वक वाचा. ऍटचमेंटबरोबर व्हायरस येऊ शकतो. असे ई-मेल माहितीची विचारणा करतात. तेव्हा महत्त्वाची गोपनीय माहिती, पासवर्ड, फोन नंबर देऊ नका.

१५) अश्लील ई-मेल बघू नका, येणाऱ्या लिंकवर क्लिक अजिबात करू नका, दुर्लक्ष करा.

१६) नियमितपणे ई-मेल, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्रामच्या अकाऊंटचा पासवर्ड बदला.

१७) वायरलेस इंटरनेट राऊटर खिडकी किंवा दरवाज्याजवळ नको. त्याची योग्य जागा म्हणजे हॉलच्या मध्यावर असावी.

१८) रेंज निवडताना, इमारत व परिसराचा योग्य विचार करावा. यामध्ये एकूण क्षेत्रफळाच्या निम्या क्षेत्रापर्यतच इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळेल अशी रेंज असावी म्हणजे बेकायशीर वापर करता येणार नाही.

१९) इंटरनेट वापरात नसेल तर बंद करावे.

२०) फक्त सुयोग्य व्यक्ती व ऍथोराईजड लॅपटॉपचा वापर होत आहे की नाही हे नेहमी तपासून पहावे.

२१) महत्त्वाच्या फाईल्स, फोल्डर्स व गोपनीय माहिती ही फक्त ऍक्सेस असणाऱ्यांना वापरुन द्या. यामध्ये इतर कोणी बेकायदेशीर उपयोग करत नाही यावर लक्ष ठेवावे लागते.

२२) लॉग डाटा म्हणजे कोणी कोणता संगणक वापरुन इंटरनेट अथवा इन्ट्रानेटचा वापर केला याची नोंद हा लॉग डाटा दररोजच्या दररोज हार्डडिस्कवर बॅक घ्यावा.

२३) संगणकामधील महत्त्वाचे माहिती नष्ट किंवा खराब करण्यासाठी व्हायरसचा उपयोग करतात. यापासून सुरक्षा म्हणून चांगल्या प्रतीचे व सतत अपडेट करता येईल असे ऍन्टी व्हायरस प्रोग्रॅम संगणकावर नेहमीच लोड करावे.

२४) महत्त्वाच्या डाटाचा बॅकअप संगणकामधील हार्डडिस्कवर ठेवावा तसेच सी.डी. रॉमवरही ठेवावा.

२५) संगणक व नेटवर्कचा ऍडमिनिस्ट्रचा पासवर्ड कोणालाही देऊ व तो सतत बदलत रहावे.

२६) इंटरनेट वापरातून व्हायरस येण्याची शक्यता असते अशा वेळी काळजी घ्यावी. ntivirasचा वापर करावा.

२७) दुसऱ्या संगणकाकडून पेन ड्राईव्ह अथवा स्टोरेज उपकरणातून वापरावयाच्या फाइलचे व्हायरस स्कॅनिंग करुन मगच वापराव्यात.

२८) फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्रामवर वावरत विशेषतः चॅटिंग करताना गोपनीय माहिती उघड करू नका ही बाब अंगलट येऊ शकते!

# डॉ. भवरलालजी जैन स्मृती व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गांधीजींच्या विचारांना पुढे नेणारी भवरलालजींची दूरदृष्टी

## प्रा. चेतनसिंह सोलंकी यांचे प्रतिपादन!

**जळगाव/प्रतिनिधी**

महात्मा गांधी यांनी निसर्ग आणि पर्यावरण जसे आहे तसे ठेवायचा प्रयत्न करा, असे आवाहन केले होते. जैन उद्योग समुहाचे संस्थापक श्रद्धेय डॉ. भवरलालजी जैन यांनी गांधीजींच्या विचाराच्या पुढे जाऊन दूरदृष्टीने आवाहन केले. आज आहे त्यापेक्षा अधिक चांगला निसर्ग आणि पर्यावरण भावी पिढीसाठी ठेऊन जायला हवा. भवरलालजी यांनी जसे विचार मांडले तसे ते आचारणात आणले. निसर्ग आणि पर्यावरणात वावरर्णाऱ्या मानवासह पशू-पक्षी-प्राणी-जीव-जंतू यांचा जगण्याचा विचार त्यांनी केला. आपल्या उद्योगाचे हेच सूत्र त्यांनी अंगिकारले. असे प्रतिपादन एनर्जी स्वराज फाऊंडेशनचे संस्थापक प्रा. चेतनसिंह सोलंकी यांनी ऑनलाईन व्याख्यानमालेत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गांधी रिसर्च फाउंडेशनचे चेअरमन डॉ. अनिल काकोडकर होते तर डॉ. सुदर्शन आयंगार आणि जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांची विशेष उपस्थिती होती. वेबेएक्स पवर लिंकसह आणि युट्यूब आणि फेसबुकवर लाईव्ह पद्धतीने प्रा. सोलंकी यांचे व्याख्यान प्रसारित झाले.

गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या पुढाकारात डॉ. भवरलालजी जैन स्मृति व्याख्यान मालेचे पहिले पुष्प प्रा. सोलंकी यांनी गुंफले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय ग्रामीण आणि कृषि स्थिरता - आवश्यकता आणि दृष्टीकोन हा होता. आरंभी श्रद्धेय भाऊंना आवडणारी रचना 'मेरी भावना' ही प्रार्थना प्रस्तुत झाली. कार्यक्रमाचे प्रास्तविक सुदर्शन आयंगार यांनी केले. देशाच्या संस्कृतितला प्रमुख आधार शेतकरी असतो असे श्रद्धेय भवरलालजी मानायचे. जल, जमीन, जंगल आणि ग्रामविकास याबाबत मोठ्याभाऊंचे कार्याबाबत त्यांनी आवर्जून सांगितले. सोलर मॅन ऑफ इंडिया म्हणून ज्यांचा परिचय सर्वांना आहे असे प्रो. चेतनसिंग सोलंकी यांचा परिचय डॉ. आश्विन झाला यांनी करून दिला.

प्रा. सोलंकी स्वतः सौर ऊर्जेच्या वापराविषयी देशभर प्रचार-प्रसार भ्रमण करीत आहेत. सौर ऊर्जेचा वापर केल्याने पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर कमी होतो आणि त्यासाठी लागणारे संसाधन निसर्गात जैसे थे राहतात. शिवाय प्रदुषणासह हवामानातील बदलांचे दुष्परिणाम संभवत नाही. पंचमहाभूत (जल, जमीन, आकाश, वायू आणि अग्नी) यांचे आजचे अस्तित्व टीकविणे किंवा त्यांचा स्तर सुधारणे यासाठी सौर ऊर्जेचा वापर करा अशी मांडणी प्रा. सोलंकी करतात. हेच सूत्र धरून प्रा. सोलंकी यांनी श्रद्धेय भवरलाल जैन यांच्या कार्याचा थेट संबंध ग्रामीण आणि कृषि स्थिरता - आवश्यकता आणि दृष्टीकोन या विषयाशी जोडला. पंचमहाभूतानी मिळून ही जीवसृष्टी निर्माण झालेली आहे. त्यातला पाणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. स्व. भवरलालजी जैन यांनी आपल्या दूरदृष्टीतून पाण्याची बचत करण्यासाठी ठिबक सिंचनाचे उच्च तंत्र आणि मंत्र शेतकऱ्यांना दिला.




जगातील त्यांचे हे खूप मोलाचे कार्य आहे असा गौरवपूर्ण उल्लेख देखील प्रा. चेतनसिंह सोलंकी यांनी केला. प्रा. सोलंकी म्हणाले, भवरलालजी यांनीही पंच महाभुतांचा विचार उद्योग व उत्पादने निर्मितीत केला. त्यांनी शेत जमिनीची उत्पादकता वाढवायला गरजे एवढे पाणी वापरासाठी नवे तंत्र विकसित केले. पिकांची रोपे निर्मितीसाठी नवे तंत्र आणले. वृक्ष-वेली वृद्धीतून निर्मळ ऑक्सिजन निर्मितीचा पाठपुरावा केला.

अग्नीला उर्जेच्या स्वरूपात मानून सौर ऊर्जा निर्मितीसाठी तंत्र विकसित केले. भवरलालजी नेहमी म्हणत, आपण हे जग अधिक समृद्ध, सुंदर व स्वच्छ करून भावी पिढीसाठी सोडून जाऊ या. त्यांनी याच विचाराने दूरदृष्टी ठेऊन कार्य केले. आज निसर्ग व पर्यावरण ऱ्हासामुळे निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांचे मूळ पारंपारिक ऊर्जा निर्मितीवर वाढलेला ताण आणि त्यासाठी नैसर्गिक साधनांचा होणारा अमर्याद वापर हेच आहे. यावर जर उत्तर हवे असेल आणि आज आहे त्या स्थितीत सुधारणा हवी असेल तर भवरलाल जैन यांनी कृतीत आणलेला विचार स्वीकारून निसर्ग अधिक सुंदर करायचे प्रयत्न सुरू राहायला हवेत. प्रा. सोळंकी यांनी अनेक संदर्भ देत निसर्ग व पर्यावरणातील आव्हाने कोणती आहेत हे सांगितले. त्यामागील कारणांचे स्पष्टीकरण देताना उपाय म्हणून भवरलालजींचा दूरदृष्टीचा दृष्टीकोनही सोप्या भाषेत उलगडून दाखवला. कार्यक्रमाचे अध्यक्ष वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि गांधी रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी देखील महात्मा गांधीजी आणि भवरलालजी जैन यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख केला.

पर्यावरण, ग्रामविकास व शाश्वतता या दृष्टीने महात्मा गांधीजी आणि भवरलालजी जैन यांनी दिलेल्या मंत्राचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. ग्राम विकास, कृषिक्षेत्र आणि पर्यावरण याबाबत भवरलालजी जैन यांनी आपल्या हयातीत छान असे प्रारुप किंवा मॉडेल तयार केले आहे. सध्याची परिस्थिती व जीवनामध्ये शाश्वतीच्या दृष्टीने कार्य करू शकतो याबाबत त्यांनी खूप विचारमंथन केलेले आहे, लेखन केलेले आहे. त्यांचा जीवन मंत्र आपण सर्व अवलंबू या असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अश्विन झाला यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले.

## राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराजांना अभिवादन!

अहमदपूर : येथील यशवंत विद्यालयांमध्ये राष्ट्रसंत परमपूज्य डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक व्ही व्ही गंपले यांनी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामलिंग तत्तापूरे यांनी सूत्रसंचालन राजकुमार पाटील यांनी तर आभार कपिल बिराजदार यांनी मानले. या कार्यक्रमाला उपमुख्याध्यापक रमाकांत कोंडलवाडे पर्यवेक्षक उमाकांत नरडेले, दिलीप गुळवे सहशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# विरार व मुंबईमध्ये घरफोडी करणारे तीन सराईत चोरटे विरार पोलिसांच्या जाळ्यात



**विरार/प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांमध्ये विरार पोलीस ठाण्याच्या हद्दिमधील व्यापाऱ्यांच्या दुकानांच्या बंद शटरला लावलेली टाळे रात्री २.०० ते सकाळी ६.०० वाजण्याच्या दरम्यान कुणीतरी तोडून ड्राव्हरमध्ये ठेवलेल्या रोख रकमेची सातत्याने चोरी केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर प्रकारच्या गुन्ह्यांच्या सर्व घटनास्थळी विरार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी आणि अंमलदार यांनी भेट देऊन उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजद्वारे आरोपीच्या गुन्हे करण्याची पध्दत, तांत्रीक तपास आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे गोपचर पाडा, विरार (पू.) मधून तीन आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने आरोपी अब्दुल अनीस नूर मोहम्मद शेख, दिलमोहम्मद ऊर्फ बाबू अब्दुल कुटुस शेख व समीर ऊर्फ पापे बादशाह शेख (२४) सर्व रा. इंदिरा नगर पाईपलाईन झोपडपट्टी, बांद्रा टमीनसच्या समोर, बांद्रा पुर्व, मुंबई यांना अटक केली आहे. सदरील आरापी हे रेल्वे स्टेशन किंवा त्या जवळच्या परिसरामध्ये स्क्रू ड्रायव्हर आणि कटावणीच्या सहाय्याने दुकानांच्या शटरचे कडी कोयंडा ऊचकटून त्यामध्ये असलेली रोख रक्कमेची चोरी करण्याकरीत दिवसाच्या वेळी परिसरामध्ये फिरुन रेकी करणे आणि रात्रीच्या वेळी चोरी करणे अशाप्रकारची कार्यपध्दती वापरत असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले असून सदर आरोपींनी जवळपास १० ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली. यामध्ये विविध पोलीस ठाण्यात यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत. विरारमध्ये ६, नवघरमध्ये १, कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत १, कांदिवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ आणि वांद्रे पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ या ठिकाणी चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची कामगिरी प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. हर्षद चव्हाण, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रची वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे आणि सागर घुगरकर यांनी केली आहे

# यवतमाळ येथे जादूटोण्याच्या संशयावरून घर पेटवलं

## संपूर्ण कुटुंबाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न, चौघे जखमी



**यवतमाळ/प्रतिनिधी**

जादूटोण्याच्या संशयावरुन एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. कुटुंबावर जीवघेणा हल्ला करुन त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील तरोडा गावात ही धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील तरोडा गावात जादूटोण्याच्या संशयावरुन एका कुटुंबावर हल्ला करण्यात आला. त्यानंतर या कुटुंबाचे घर जाळण्यात आले. या घटनेत चौघे जण जखमी झाले आहेत. त्यापैकी एकजण गंभीर जखमी झाला आहे तर तिघे जण किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींवर नागपुरातील सीटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ग्रामस्थांनी केलेल्या हल्ल्यात विनायक भोरे हे गंभीर जखमी झाले असून त्यांची मृत्यूशी झुंज सुरू आहे. तर त्यांचे संपूर्ण घर आगीत जळून खाक झाले आहे. गावातीलच काही जणांनी मिळून भोरे यांच्यावर हल्ला करुन घर जाळले. भोरे कुटुंबीय जादूटोणा करत असल्याचा ग्रामस्थांना संशय होता आणि त्या संशयातूनच त्यांनी हे कृत्य केलं आहे. भोरे कुटुंबाचे घर पूर्णत: जळून खाक झाल्याने त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आता पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान या घटनेने तरोडा गावातच नाही तर संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. १३ फेब्रुवारी रोजी यवतमाळ शहरालगत असणाऱ्या वाघाडी याठिकाणी माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली होती. येथील तीन जणांनी एका मोलमजुरी करणाऱ्या वयोवृद्धाची चाकुने सपासप वार करत निर्घृण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन अल्पवयीन आरोपींसह अन्य एकाला अटक केली. संबंधित तिन्ही आरोपींची कसून चौकशी केली जात आहे. लक्ष्मण मसू जाधव असं हत्या झालेल्या वयोवृद्धाचं नाव आहे. ते यवतमाळ शहरालगत असणाऱ्या वाघाडी गावातील रहिवासी होते. ते गावात मिळेल ते काम करत आपला उदरनिर्वाह चालवत होते. पण त्यांनी शेजारी राहणाऱ्या शेळके कुटुंबीयांवर जादूटोणा केल्याचा संशय त्यांच्यावर होता. तसेच काही दिवसांपूर्वी याच परिसरात दोन जणांचा मृत्यू झाला होता. या दोघांच्या मृत्यूमागे मृत लक्ष्मण जाधव यांचा हात असावा. तसेच त्यांनी जादूटोणा केल्यानेच दोघांचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता.

# कौटुंबिक वादामध्ये मध्यस्थीची भूमिका महत्वाची -ॲड.सलगरे




**लातूर/प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लातूर येथील कौटुंबिक न्यायालयात मध्यस्थी जनजागृती शिबीराचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश मोहम्मद ए.वाय.एच तर प्रमुख पाहुणे म्हणुल ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.सलगरे हे उपस्थित होते. या शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना ॲड.सलगरे म्हणाले की, कौटुंबिक वादामध्ये एकदम टोकाची भूमिका घेवू नये, एक पाऊल मागे घ्यावे. वादामुळे घडणार्या घटस्फोटामुळे मुलांची खुप आबाळ होते. थोडा कमीपणा घेवून वाद मिटवावा. कोणताही वाद शक्यतो चिघळु देवू नये. अनेक घडलेल्या, पाहीलेल्या कौटुंबिक वादाचे त्यांनी उदाहरणे सांगितली. अध्यक्षपदावरून बोलताना कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश मोहम्मद ए.वाय.एच म्हणाले की, कौटुंबिक वाद विकोपाला नेऊ नयेत, शक्यतो ते घरातच मिटलेले चांगले. कुंटुबामध्ये क्षुल्लक कारणावरून वाद होत असतात पण त्यावर आत्ममंथन करणे महत्वाचे आहे. मनामध्ये जेंव्हा मनभिनता निर्माण होते तेव्हा वाद हे होणारच. सध्या तरूण वयाच्या मुला मुलीमध्ये वाद होण्याचे प्रमाण जास्त असुन अंहकारामुळे खुप मोठे नुकसान होत आहे. व्यावसायिक विचार करून भविष्याचा सखोल विचार करावा. वाद करण्याचे टाळावे. सुखी व समृध्द आयुष्य जगावे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन एन.ए.गाताडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अक्षय कांबळे यांनी मानले. यावेळी कौटुंबिक न्यायालयातील एस.डी.मोरे विवाह समुपदेशक वर्ग-१, श्रीमंत दि गायकवाड प्रबंधक, यदुनाथ महाराज, श्रीमती टी.जी कोकाटे, ए.आर. ढगे, बेलीफ एस.बी.शेख, आर.एम.नांदुरकर, गणेश कुलकर्णी, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक एच.एम. चौंडीकर हे उपस्थित होते. या शिबीरासाठी पक्षकार, विधीज्ञ मोठया संख्येने उपस्थित होते.

# देवणी पोलिसांकडुन कारसह सात लाखांचा गुटखा हस्तगत

**देवणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला तंबाखुजन्य गुटखा कर्नाटक राज्यातुन महाराष्ट्रात येत असल्याची देवणीचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक गणेश सोडारे यांना माहिती मिळाली. त्यावरुन पोलीस नाईक प्रशांत स्वामी यांना तोगरी मोड येथे तात्काळ जाऊन सापळा लावण्यासाठी आदेश दिले. त्यानुसार कर्नाटक राज्यातुन येणारी एअरटिका कार पकडून पाहणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधीत तंबाखू जन्य गुटखा मिळुन आला. सदर गुन्हामध्ये गुटखा आणि गाडीची एकुण किंमत सात लाख पंधरा हजार दोनशे साठ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विठ्ठल सटवाजी लोंढे अन्न सुरक्षा अधिकारी लातुर यांच्या फिर्यादवरुन देवणी अरोपी अजहर हमीदसाब शेख (३२) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. सदरचा गुटखा पकडणारे प्रशांत स्वामी यांना आजतागायत एकुण ८७ पारीतोषके पोलीस प्रशासनाकडुन मिळाले असून अशा धडाकेबाज व दबंग पोलीस नाईकास देवणी सारखे बिट दिले. तर देवणी, तोगरीत लपुन छपुन चालणारे मटक्या सारखे अवैद्य धंदे बंद करायला पोलीस नाईक प्रशांत स्वामी यांना वेळ लागणार नसल्याचे देवणी शहरातील सुजान नागरीकातून बोलले जात आहे. याकडे आता कृतव्यदक्ष पोलीस निरीक्षकांनी वरील संदर्भात वेळीच विचार करावा अशी मागणी जनतेतून होत आहे. सदर गुन्हाचा तपास हा पो.हे.का.विनायक कांबळे व गणेश बुजारे यांच्याकडे देण्यात आला आहे.

# रेल्वेतून पडलेल्या महिलेचे पोलिस अंमलदाराने वाचवला जीव



**जळगाव/प्रतिनिधी**

धावती रेल्वे पकडतांना घाईगर्दीत महिलेचा हात निसटल्याने, पाय-यांवरुन पाय घसरलेल्या महिलेचा जीव वाचवणाऱ्या पोलिस अंमलदाराचा पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांनी सत्कार केला आहे. दिनेश विश्वनाथ बडगुजर असे सत्कारार्थी जिल्हा विशेष शाखेतील पोलिस अंमलदाराचे नाव आहे.

१५ फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी ११०४० अप गोंदीया कोल्हापूर ही गाडी जळगाव रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर सुमारे सात वाजेच्या दरम्यान आली होती. यावेळी अनेक जण धावत्या रेल्वेच्या बोगीत चढण्याचा प्रयत्न करत होते. दरम्यान सौ. सुनिता पांडुरंग बेडीस (५०) या आपल्या पतीसह धावत्या रेल्वेत चढण्याचा प्रयत्न करत असतांना त्यांचा हात निसटून पाय घसरला. दरम्यान रेल्वेने वेग धरला होता. यावेळी जळगाव पोलिस दलातील विशेष शाखेतील अंमलदार दिनेश बडगुजर हे आपले प्लॅटफॉर्मवरील कामकाज आटोपून बाहेर जाण्याच्या तयारीत असतांना त्यांचे या घटनेकडे लक्ष गेले. सुनिता बेडीस यांचा पाय धावती रेल्वे आणि प्लॅटफॉर्मच्या आत अडकला होता. त्याचवेळी प्रसंगावधान राखत बडगुजर यांनी तातडीने त्यांना बाहेर खेचून काढले. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज संकलीत करण्यात आले. दिनेश बडगुजर यांनी दाखवलेल्या कामगिरीची दखल घेत पोलिस अधिक्षक डॉ.प्रविण मुंढे यांनी प्रशस्तीपत्र देत त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित असलेले अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, पोलिस उप अधिक्षक (गृह) विठ्ठल ससे, जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब ठोंबे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार बकाले यांनी देखील त्यांचा सन्मान केला.

# दक्षिण सोलापूर मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संजीव इंगळे उपाध्यक्षपदी अशोक सोनकंटले, तर सचिवपदी आनंदराव बिराजदार




**सोलापूर/इरप्पा बोरीकराजगी**

दक्षिण सोलापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संजीव इंगळे, उपाध्यक्षपदी अशोक सोनकंटले तर सचिवपदी आनंदराव बिराजदार यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीनिमित्त सालाबादाप्रमाणे दक्षिण मराठी पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संघाचे प्रभारी सचिव शिवदास वाडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार्क चौकातील जिल्हा कार्यालयात पार पडली. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव या पदांसाठी प्रत्येकी एकेक अर्ज आल्याने त्यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी कोषाध्यक्ष सुभाष येणगुरे, प्रसिद्धी प्रमुख धोंडप्पा रूपनुरे, सहसचिव ईरप्पा बोरीकरजगी, संघटक शिवदास वाडकर, सदस्य शिवय्या स्वामी, हसन नदाफ, नागेश कोळी, तुकाराम शेंडगे, सल्लागार पंचप्पा धनशेट्टी, पंचाक्षरी स्वामी, बिसलसिध्द काळे आदींची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर नूतन पदाधिकारी यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्रेमाची अनोखी केमिस्ट्री 'वन फोर थ्री' चित्रपटातून ४ मार्चला झळकणार

**लातूर/प्रतिनिधी**




रोमँटिक चित्रपटांच्या चलतीमध्ये वन फोर थ्री चित्रपट पुढे सरसावत असून, प्रेमाची अनोखी परिभाषा प्रेक्षकांसमोर घेवून येत शारदा फिल्म प्रॉडक्शन निर्मित आणि विरकुमार शहा निर्मित वन फोर थ्री हा प्रेममय भावना व्यक्त करणारा आणि खऱ्याखुऱ्या जीवनावर आधारित, दाक्षिणात्य चित्रपटाच्या धाटणीचा हा मराठीतील पहिला-वाहिला एक नवा चित्रपट येत्या दि.४ मार्च २०२२ राज्यातल्या अनेक चित्रपटगृहातून झळकणार आहे, असे सांगून याचा प्रेक्षकांनी आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन दिग्दर्शक योगेश भोसले यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले. प्रेमाचे विविध रंग मांडत य चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे, चित्रपटाच्या पोस्टरवर मी दिग्दर्शक, अभिनेता योगेश आणि अभिनेत्री शितल अहिरराव यांची केमिस्ट्री पहायला मिळत आहे. तर अभिनेता वृषभ शहाचा खलनायकी जबरा असा रुप प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.या चित्रपटात सुरेश विश्वकर्मा आणि शशांक शेंडे यांनी देखिल भूमिका साकारली आहे. या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन पी.शंकरन यांनी केले असून, लखन चौधरी यांचे गाण्याचे बोल आहेत. आर्या अंबेकर हिने भरली मना मध्ये हे गाणे गायिले आहे.वाचू दे इष्काचा प्राण ही कव्वाली प्रमोद त्रिपाठी यांनी गायली आहे, आयटम साँग पडला पडदा हे रेषमा सोनावणे हिने शब्दबध्द केलेय, आनंद शिंदे यांनी धिंगाणा पार्टी साँग गायले आहे.आर.कलाई कुमार यांनी नृत्य दिग्दर्शन केलेय, विकास सिंग यांनी उत्तम चित्रीकरण केले असून, हे आपलं काळीज हाय या वन फोर थ्री चित्रपटाच्या टॅगलाईनने आधिच धुमाकुळ घातला असताना हा चित्रपट नवे काय घेवून येणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. वन फोर थ्री या चित्रपटाची कथा वास्तव जीवनावर आधारित असून यात एकमेकांवर जीव जडलेल्या प्रेयसी आणि प्रियकाराची कथा पहायला मिळणार आहे, या चित्रपटाच्या टिझरने, गाण्याने प्रेक्षकांची उत्सुकता अधिक ताणली गेली आहे, यात शंका नाही, तेव्हा येत्या ४ मार्चला आपण सर्वांन तो पहावा असे असे योगेश भोसले याने आवाहन केले. या पत्रकार परिषदेला अभिनेत्री शितल अहिरराव, खलनायक वृषभ शहा, अनिता पाटील आदी उपस्थित होते.


## E-QUOTATION NOTICE No (For Estimate Purpose)

Sealed and superscripted quotations are invited by the Executive Engineer, P.W. Division , Palghar P.W.D. Govt. Rest House Compound, Old Manor Palghar Road, Palghar (E) 401 404 for supply of following materials. Quotation Submitted as to reach this office on or before from dt.02/03/2022 to dt.08/03/2022 upto 2.00 p.m. and will be opened on the dt.11/03/2022.

| Sr. No | Particular | Quantity |
|---|---|---|
| | Solar Tunnel Dryer for Asstt. Commissioner of Fisheries, at Palghar. | Per No. |
| 1. | SOLAR TUNNEL DRYER 128 SQ FT PARABOLIC TYPE<br>Civil Work : Concrete Bed flat form (Length - 5m, Width - 2.75m and Height 2.25m) with CC Foundation for Poles.<br>Absorber : Poly Carbonate 6mm thickness.<br>Absorber Sheet : Top and Bottom Ultra Violet Stabilized with 60 Microns<br>Shape : Parabolic Shape.<br>Area : 128 Sq. feet (16 x 8 feet)<br>Center Height : 7 feet.<br>Temperature : 55-65°c (based on the climatic condition on a full sunny day).<br>Structure & Door : GP Square Pipe frame (38mm)<br>Structure Purlin: GP Square Pipe (38mm) c 38mm.<br>Arch : GP Square pipe (38mm) (50mm)<br>Sealing : Silicon sealant with EPDM<br>Circulation Fans : Fans Provided 2 Nos.<br>Exhaust : DC Fan Provided with solar panel.<br>Automatic Control Panel : Temp/Moisture.<br>Base Pipes : 3 Inch with 6 inch base plate 6mm thickness.<br>Sensors : Temperature sensor and Humidity sensor.<br>Application : Vegetables.<br>Drying Capacity : 300kgs Based on the product.<br>Best operating Hours : 6 hours (10 A.M. to 4 P.M.) | Per No |
| 2. | Racks : MS Square Pipe (If Customer Required) | Per No |
| 3. | Trays : G I (If Customer Required) | Per No. |
| 4. | Solar Power Supply System : Solar Panel -1KW, Inverter and battery for Min. 3 Hr Backup | Per No. |

The Suppliers /Contractors/firms Should ensure that their quotation to submitted on or before the expiry of the date and time. The Suppliers /Contractors/firms should ensure with document i.e GST Certificate, Pan Card and Shop license certificate.

The rates should be quotated inclusive of all taxes and free delivery and installation at site in Palghar District.

Right to reject anyone or all quotation without assigning any reason is reserved by the undersigned.

No. Palghar/Store/1933
Office of the Executive Engineer
P.W. Division , Palghar
Dated : 25/02/2022

sd/-
Executive Engineer
P.W. Division Palghar

जिमाका/पालघर/जाहि १११/९८/२०२२ दिनांक : २५/०२/२०२२

28 FEBRUARY TO 06 MARCH 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 26/02/2022 9:54 PM Page 1



# पालघर जिल्ह्यात मिळणार महाबळेश्वर स्ट्रॉबेरीची चव!



**पालघर/प्रतिनिधी**

भगीरथ भुसारा आणि त्यांची पत्नी (चित्रात) यांनी पालघरमधील मोखाडा येथे त्यांच्या ९,५०० चौरस फूट शेतात स्ट्रॉबेरीची यशस्वीपणे लागवड केली आहे आणि या प्रयोगामुळे त्यांना चांगले परिणाम मिळाले आहेत. त्यांनी २५० प्रति किलो दराने फळे विकली आहेत आणि मुंबई मेट्रो व्यतिरिक्त सुरत, अहमदाबाद, राजकोट आणि गुजरातमधील इतर शहरांमधून ऑर्डर्स येत आहेत. शेतकरी जोडप्याने 'विकेल ते पिकेल' योजनेचा एक भाग म्हणून स्ट्रॉबेरीची लागवड हाती घेतली ज्यामध्ये राज्य सरकार शेतकऱ्यांना पिकांवर प्रयोग करण्यासाठी आणि फक्त एका स्थानिक पीक-तांदूळावर चिकटून न राहण्यासाठी प्रोत्साहित करते- जेणेकरून इतर भागात स्थलांतर थांबेल. कामाच्या शोधात सामान्यतः स्ट्रॉबेरीची लागवड महाराष्ट्रातील महाबळेश्वर, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, दिल्ली, हरियाणा, पंजाब आणि राजस्थानमधील थंड हवामानात केली जाते. पालघरमधली लाल माती स्ट्रॉबेरी पिकवण्यासाठी अनुकूल नाही पण मी ठरवलं. माझ्या छोट्याशा शेतजमिनीवर प्रयोग करण्यासाठी.

मी आणि माझी पत्नी नोव्हेंबर २०२१ मध्ये कधीतरी महाबळेश्वरला भेट दिली आणि स्ट्रॉबेरीची रोपे विकत घेतली आणि हि रोपे आम्ही कच्छमधील आमच्या शेतात, म्हणजे हिवाळ्याच्या महिन्यांत लावली. नोव्हेंबर. स्ट्रॉबेरीला कमी पाणी लागते हे मला कळल्यामुळे मी शेतीचे माझे प्राथमिक ज्ञान वापरले आणि मी इस्रायलमध्ये प्रसिद्धपणे शोधून काढलेल्या ठिबक सिंचनाचा वापर केला, जिथे सिंचनाचे असे मॉडेल मोठ्या प्रमाणावर वापरले जाते आणि त्यामुळे मला खूप मदत झाली आणि चांगले परिणाम मिळाले, असे भुसारा म्हणाले. एकट्या जानेवारी महिन्यात मला सुमारे ३०० किलो फळांचे उत्पादन मिळाले आणि चांगली बाजारपेठही मिळाली, असे भुसारा यांनी सांगितले. सामान्यत: महाबळेश्वर जातीच्या स्ट्रॉबेरीचे वजन प्रत्येकी २५ ते ३० ग्रॅम असते, परंतु माझ्या रसाळ फळाचे वजन ८५ ते ९० ग्रॅम इतके असते. प्रेमदास राठोड, कृषी अधिकारी म्हणाले, भुसाराचे असे प्रयोग नेहमीच प्रोत्साहन देणारे असतात आणि अशा उपक्रमांना आमचा नेहमीच पाठिंबा असतो. याआधी चार वर्षांपूर्वी भुसारा यांनीही मोगरा फुलांची लागवड केली होती आणि आता त्यांनी स्ट्रॉबेरी पिकवून पुन्हा प्रयोग केल्याचे राठोड यांनी सांगितले. जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड, डहाणू, तलासरी या भागात विशेषत: शेतकऱ्यांचे कामाच्या शोधात दूरदूरच्या भागात स्थलांतरित होण्याच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आणि शेतकऱ्यांनी, स्थानिकांनी शेतीसाठी नाविन्यपूर्ण पावले उचलल्यास स्थलांतर थांबेल आणि चांगल्या संधी निर्माण होतील.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय

**(महसूल शाखा)**

किल्ला बंदर रोड, मालोंडे, वसई गांव, ता.वसई, जि. पालघर पिन - ४०१२०१ दुरध्वनी क्र. (०२५०) २३२२००७

नमूना ५ (नियम १२ (२) (अ) पाहा)

**समपहरण केलेल्या मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस**

ज्याअर्थी श्री. मोहम्मद शकील अख्तर रा. फ्लॅट नं. ४०३, चौथा मजला, बिल्डींग नं. ईसी १७३, एव्हरशाईन सिटी अव्हेन्यु. सेक्टर नं.७ ता. वसई, जि. पालघर यांच्याकडून येणे असलेल्या, खालील तक्त्याच्या कलम (५)मध्ये निविर्दिष्ट केलेल्या, जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खालील विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे समपहरण करण्यात आले आहे.

त्याअर्थी याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, विक्रीसाठी यामध्ये निश्चित केलेल्या दिवसापुर्वी तलाठी सजा माणिकपूर यांच्याकडे देय रक्कम दिली नसेल तर उक्त मालमत्ता, तिच्यावर बसविण्यात आलेल्या सर्व भारापासून व तिच्या संबंधात करण्यात आलेली सर्व अनुदाने व संविदा यांपासून मुक्त, अशी मालमत्ता प्रत्यक्ष जागेवर येथे दिनांक १०/०३/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ०४.०० वाजता किंवा वाजण्याच्या सुमारास, जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल.

| गाव | भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक | क्षेत्र | आकारणी | देय असलेल्या जमीन महसूलाची थकबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| एव्हरशाईन सिटी माणिकपूर, वसई (पुर्व) | सिटी स.नं. ४३६/१९ फ्लॅट नं. ४०३, चौथा मजला, बिल्डींग नं. ईसी १७३ एव्हरशाईन जास्मिन को.हौ.सो. एव्हरशाईन सिटी अव्हेन्यु सेक्टर नं.७ वसई पुर्व. | ४९.४ चौ.मी. | - | २४,६६,०००/- |

दिनांक : २५/०२/२०२२ रोजी माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

क्र./मशा/कक्ष-१/टे-वसुली/म.व.प्र./एसआर-२०/२०२२
दिनांक : २५/०२/२०२२

सही/-
तहसिलदार, वसई

# टेंभीखोडावे येथे विविध दाखले अंतर्गत विशेष उपक्रम



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा टेंभीखोडावे येथे पालघर तहसिलदार कार्यालयाच्या वतीने दि. २० फेब्रुवारी रोजी ग्रामस्थांना रेशनकार्ड बाबतची विविध कामे, संजय गांधी योजने अंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना दाखले आदीचा लाभ मिळावा म्हणून विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना तथा ग्रामस्थांना विविध दाखल व इतर योजनांचा लाभ देण्यात आला. या वेळी संजय गांधी निराधार योजने अंतर्गत ६० पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. दुय्यम शिधापत्रिका धारकांना शिधापत्रिका देणे, शिधापत्रिकेवरून नावे कमी करणे आणि वाढविणे याकामी अनेक ग्रामस्थांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी लाभार्थ्यांना त्वरित उत्पन्न दाखले देण्यात आले. माजी राज्यमंत्री सौ. मनीषा निमकर आणि सफाळे येथील सामाजिक कार्यकर्ते समीर म्हात्रे यांच्या पुढाकाराने या विविध दाखले उपक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा परिषद शाळा टेंभीखोडावे येथे आयोजित या उपक्रमात महसूल विभागातील नायब तहसिलदार श्रीमती शामली धापाडे, मंडळ अधिकारी राजेंद्र पाटील, सजा टेंभीखोडावेचे तलाठी किरण जोगदंड, देवेंद्र पाटील, पुरवठा विभागाचे कर्मचारी उषा मेटकर यांनी सहभाग नोंदवला. यावेळी टेंभीखोडावेच्या सरपंच सौ. संजना पाटील यांच्या हस्ते महसूल विभागाचे कर्मचारी, अधिकारी यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. उपसरपंच सौ. योगिता भोईर, ग्रामपंचायत सदस्य विजय गावड, धनेश गावड, सुधीर पाटील, हरिदास भोईर, काशिनाथ म्हात्रे, देवराम भोईर, जग्गु पाटील आदी ग्रामस्थ उपस्थित होते. उपक्रमाला सहकार्य आणि मदत करणाऱ्या सर्वांचे टेंभीखोडावे ग्रामपंचायत मार्फत आभार मानण्यात आले.

# देवर्जन - देवणी कायमस्वरुपी पाणीपुरवठ्याचे ७० टक्के श्रेय संभाजीराव पाटील निलंगेकरानाचं!

**देवणी/प्रतिनिधी**

देवर्जन तलावातील पाणी देवणीसाठी अरक्षित करून ते देवणीला हि योजना आणण्यासाठी सत्तर टक्के काम तात्कालीन पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकरांनी केले. या योजनेसाठी नगर पंचायतचा पाठापुरावा कुठेतरी कमी पडला. त्यामुळेच भारतीय जनता पक्षाच्या काळातील पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली नाही. मात्र ७० टक्के या योजनेस लागणाऱ्या कागदपत्रे पुरवठा करण्याचे काम भारतीय जनता पक्षाने केले आहे. याचे श्रेय कोणीही घेऊ शकते. मात्र लाखो रुपयाची योजना मी मंजूर केले म्हणणे श्रेयवाद लाटणे हा आहे. पण याचे श्रेय फक्त आणि फक्त भारतीय जनता पक्षालाचा जाते. लिंबोटी धरणाचे पाणी काँग्रेस + भाजपा + राष्ट्रवादी यांच्या कार्यकाळात पुर्ण झाले व पाणी उदगीरला आले.

या पाण्याचे श्रेय घेण्यासाठी एकमेकावर अरोप - प्रत्यारोप करीत असताना दिसत आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात नगर विकास मंज्याचे पाणी पुरवठा खाते योगायोग उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांच्या कडे आहे. बनसोडे हे या खात्याचे मंत्री असल्यामुळे देवणीचा कायमस्वरुपीचा पाणीपुरवठा संपणार असल्याचे बोलले जात आहे तुम्ही मला बहुमत द्या मि तुमचा सर्वागीण विकास करु असा शब्दच संजय बनसोडे यांनी दिल्याने देवणीकरांची सेवा करण्याचा मोका काँग्रेस महाविकास आघाडीला दिला आहे. काँग्रेस व महाविकास आघाडीचे बहुमत समीकरण काँग्रेसच्या बाजुने असल्यामुळे सर्वच विषय समित्या या काँग्रेस पक्षाच्या वाट्याला गेल्याने अपवाद एक बांधकाम समिती हे राष्ट्रवादीच्या हिस्याला आली आहे. नगरसेवक मात्र मल्लीकार्जुन मानकरी यांच्या समोर मात्र सदाबहार दिसत आहेत. पाठीमागे पदासाठी मारामार होत असतानाचे चित्र दिसून येत असल्याचे बोलले जात आहे.

नगर सेवकात मात्र नाराजीचा सुर दिसुन येत आहे? याचेच ताजे उदाहरण म्हणजे शहरातील स्वच्छताच कॉन्ट्रक्ट प्रत्येक नगरसेवकांनी माझ्याकडे द्या म्हणून स्वामी नावाच्या गुत्तेदारास सारखे फोन करून बेजार करीत असल्याचे बोलले जात आहे तसेच स्वामी या गुत्तेदाराने अध्यक्ष व उपाध्यक्षाना भेटुन गुप्त बैठक घेतली असल्याचे बोलले जात आहे. मात्र एक ना एक दिवस नगरसेवकांमध्ये या भांडणाचे स्पोट शहरातील नागरिकांना पाहायला मिळेल यात तिळमात्र शंका नाही हे मात्र खरे?

# पाणी चोरी करणाऱ्या तब्बल १०४ नळ जोडण्या पालिकेने केल्या खंडित!




**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार महापालिका क्षेत्रात बेकायदा नळजोडण्या मोठ्या प्रमाणात देण्यात आल्या असून त्यातून मोठ्या प्रमाणात पालिकेच्या योजनेतील पाण्याची चोरी केली जाते. तर दुसरीकडे प्रामाणिक कर दात्यांना आपल्या नळातून पालिकेकडून पुरेसा पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे दररोज हजारो नागरिकांना पाण्याच्या गैरसोयीला तोंड द्यावे लागत आहे. पालिकेने मात्र बेकायदा नळजोडण्या असल्याची तक्रार मान्य केली असून अशी पाणी चोरी करणाऱ्या १०४ नळ जोडण्या पालिकेने खंडित केल्या आहेत. यापुढेही कारवाई सुरु राहणार आहे, असे पालिकेने स्पष्ट केले आहे. वसई-विरारची प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढत असून एकेकाळी मुबलक असणारा पाणी पुरवठा बेकायदा बांधकामे तसेच बेकायदा नळजोडण्या यामुळे महानगरातील सर्वदूरच्या नागरिकांना मागणीप्रमाणे नळजोडण्या देवून पुरेसा पाणी पुरवठा करणे, गेल्या बारा-तेरा वर्षात पालिकेला शक्य झालेले नाही. गेल्या वीस वर्षात जव्हार तालुक्यातील सूर्या धरणावरील धामणी कवडास धरणावरील पाणी पुरवठा योजनेतील तसेच भिवंडी तालुक्यातील ऊसगाव येथून व महामार्गावरील पेल्हार येथील बंधाऱ्यातून वसई-विरारला पाणी पुरवठा केला जातो. २३० दश लक्ष लिटर्स दररोज मिळणाऱ्या पाणी पुरवठ्यातून पालिकेने आत्तापर्यंत ५२ हजार ४५ नळजोडण्या पालिकेच्या नऊ प्रभाग समिती क्षेत्रातील नागरिकांना वितरित केल्या आहेत. हे पाणी पुरेसे नाही. आजही पाणी पुरवठा विभागाच्या मते दररोज १४२ दश लक्ष लिटर्स अधिक पाण्याची महानगराला गरज आहे. अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे पालिकेने एक वर्ष आधीपासून नागरिकांची नळ जोडण्यांची मागणी पूर्ण केलेली नाही. पालिकेकडे आजपर्यंत २४४८ नळजोडण्या मागणीचे अर्ज आलेले आहेत. तर दुसरीकडे पाण्याचा बेकायदा पुरवठा होत आहे. आजपर्यंत पालिकेने जेवढ्या नळ जोडण्या दिल्या आहेत. त्यापेक्षा अधिक अनधिकृत नळ जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. नवे आयुक्त अनिलकुमार पवार यांच्याकडे ही माहिती आल्यावर त्यांनी पाणी पुरवठा विभागाकडून बेकायदा नळ जोडण्यांवर कारवाई सुरु केली आहे. १०४ नळजोडण्या खंडित केल्यावर काही पाण्याचा काळा बाजार करणारे महारथी देखील पालिकेच्या पथकाला आढळून आले असून ही मंडळी पालिकेकडून होणाऱ्या पाणी पुरवठ्याची चक्क विक्री करीत आहेत. असे आढळून आले आहे. तर काही ठिकाणी पालिकेच्या वॉलमन कडूनच काही नळ जोडण्या परस्पर देण्यात आल्याचे समजते. 'सी' प्रभाग समिती चंदनसार येथे बेकायदा ८३ नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. त्यात काही नळजोडण्यांना गळती लागली होती. इतर प्रभाग समित्यांमध्ये अशा दुरुस्तीच्या ६६५ तक्रारी आलेल्या आहेत. त्या दुरुस्त करण्यात आल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली.

पान १ वरून....



### भाजी मार्केटवाल्या गुन्हेगाराचा भरदुपारी ...

पोलिसांची किंवा पालिकेची परवानगी घेतलेली नव्हती. कारण समय चौहान हा गुन्हेगारी प्रवृतीचा होता आणि कुख्यात सुभाषसिंग ठाकूरचा तो सहकारी होता. त्याच्यावर खुनासारख्या दोन गंभीर गुन्ह्यांची नोंद असून तो जेल भोगून आलेला आहे आणि दादागिरीच्या जोरावर त्याने हे मोकळे मैदान हडप करण्यासाठीच येथे बेकायदेशीर बाजार भरवला होता असे इथल्या लोकांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर विरार मधील बांधकाम व्यावसायिक निकांत कदम यांच्या हत्या प्रकरणात समय संशयित होता. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते, पण चौकशीनंतर सोडले. मात्र त्या प्रकरणात त्याचा भाऊ चंद्रभान आणि त्याचे काही साथीदार अजूनही तुरुंगात आहेत आणि निकांत कदमचे नातेवाईक आजही निकांत हत्या प्रकरणात समय चौहान याचेच नाव घेत आहेत. आणि इतका भयंकर क्राईम हिस्ट्री असलेला माणूस मोकळी जागा अडवून त्या ठिकाणी बाजाराच्या नावाखाली स्टॉल लावतो आणि ते भाड्याने देतो आणि पोलीस व पालिकेचे अधिकारी त्याच्यावर कोणतीही कारवाई करीत नाहीत याचा अर्थ समय चौहान कडून पालिका अधिकारी आणि पोलीस यांनाही काहीतरी मिळत असावे म्हणूनच समयला इतकी मोकळीक मिळाली. मग समय सारख्या दाखलेबाजांना जर पालिका आणि पोलीस मदत करणार असतील तर असे गुन्हे घडणारच! त्यामुळे या प्रकरणात पोलीस आयुक्तांनी विरार पोलिसांची चौकशी करावी तसेच पालिका अधिकाऱ्यांची सुद्धा प्रशासनाने चौकशी करावी अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. समय चौहान हत्या प्रकरण वाटते तितके सोपे नाही. कारण असे बाजार भरवणारे लोक हे गुन्हेगारी प्रवृतीचे आहेत. त्यामुळे शनिवारच्या गोळीबाराच्या घटनेची चंदनसार किंवा इतर ठिकाणी भरणाऱ्या बाजारात पुनरावृत्ती होऊ शकते. जर शनिवारी ती गोळीबाराची घटना गर्दीच्या ठिकाणी घडली असती तर नाहक प्राणहानी झाली असती आणि म्हणूनच आता तरी पोलीस आणि पालिका प्रशासनाने आपल्या झालेल्या चुका सुधारून भविष्यात विरारमध्ये बेकायदेशी बाजार भरायला देऊ नये आणि जर कुणी मोकळ्या जागेत असे बेकायदेशीर भाजी बाजार भरवणार असतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी जनतेने केली आहे.

### रक्ताचे नाते अखेर रक्तरंजित ठरले...

करून त्याला न्यायालयात दाखल केलं असता त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी जुगनूसिंह यानं घटनेच्या दिवशी २३ फेब्रुवारी रोजी आपला धाकटा भाऊ अरुणसिंह यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली होती. पण अरुणसिंह यानं पैसे देण्यास नकार दिला. यामुळे मोठ्या भावाला संताप अनावर झाला. याच कारणातून त्याने अरुणसिंहला लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही मारहाण इतकी भयंकर होती की, यामध्ये अरुणसिंहचा जागीच मृत्यू झाला. हत्येची ही थरराक घटना उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच इतवारा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. त्यानंतर पोलिसांनी आई गंगाबाई ठाकूर यांच्या फिर्यादीवरून आरोपी मुलगा जुगनूसिंह ठाकूर याला अटक केली. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केलं असता न्यायालयाने त्यास पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपीची कसून चौकशी केली जात आहे. दारूच्या पैशांसाठी लहान भावाचा जीव घेतल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पान ८ वरून...

### नवाब मलिकांना मंत्रिमंडळातून काढण्याचा...

यांनी भर विधिमंडळात भ्रष्ट पोलीस अधिकारी सचिन वाझे याची पाठराखण केली होती. त्यानंतर खंडणीखोर अनिल देशमुख यांनाही पाठीशी घालण्याचे आटोकाट प्रयत्न केले. केवळ सत्ता टिकविण्यासाठी भ्रष्ट, व्यभिचारी आणि लाचखोर, खंडणीखोर सहकाऱ्यांना वाचविताना ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या ठाकरी बाण्यास मूठमाती दिली. आता मतांच्या राजकारणासाठी देशद्रोही कारवायांतील सहभागाचा आरोप असलेल्या नवाब मलिक या मंत्र्याकरिता आपला कणा झिजविण्याची वेळ उद्धव ठाकरे यांच्यावर आली आहे. स्वतःची मुख्यमंत्रीपदाची खुर्ची सांभाळण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांचे अनुयायी असलेल्या कडवट शिवसैनिकांच्या भावनांची थट्टा चालविली आहे, असा आरोप माजीमंत्री आ. निलंगेकर यांनी केला. नवाब मलिक या मंत्र्याने दाऊदच्या कारवायांसाठी बेनामी पद्धतीने मालमत्ता हडप करून गरीब कुटुंबांची फसवणूक केली असून हा पैसा दाऊदकडे वळविल्याचा आरोप आहे. दाऊदच्या दहशतवादी कारवायांना आर्थिक साह्य करण्याच्या अशा गुन्हेगारी व देशद्रोही कारवायांना सत्ताधारी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने संरक्षण द्यावे हा महाराष्ट्राच्या कोट्यवधी नागरिकांच्या सुरक्षिततेशी सामूहिक खेळ आहे.

अशा खेळात सहभागी होऊन राज्याच्या सुरक्षेला आव्हान देणाऱ्या जनताविरोधी सरकारच्या निषेधार्थ भाजप संपूर्ण शक्तिनिशी लढा देईल, असा इशाराही माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिला. या पत्रकार परिषदेला भाजपा जिल्हाध्यक्ष आ.रमेश कराड आ.अभिमन्यू पवार भाजपा शहर जिल्हाध्यक्ष गुरूनाथ मगे यांची उपस्थित होते.

### नवी मुंबई येथे माहिती व जनसंपर्कच्या...

प्रात्यक्षीकासह झालेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमाला कोकण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणाच्या प्रारंभी माहिती सहाय्यक प्रविण डोंगरदिवे यांनी प्रास्ताविक केले.

### सोलापूर शहरात दामिनी पथक ...

द्यावी त्यानंतर अन्याय करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराचा दामिनी पथक यामुळे आळा बसणार असून सर्व महिलांनी निर्भयपणे राहावे असेही आवाहन पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी केले.

### हजारो पोलीस हवालदारांचे पोलीस ...

यामुळे पोलीस दलाची प्रतिमा सुधारण्यास मदत होईल शिवाय पोलीस दलास सद्यस्थितीत प्रत्यक्ष कामकाजाकरीता मिळणाऱ्या मानवी दिवसांमध्येही मोठी वाढ होईल. या निर्णयामुळे पोलीस शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत पदोन्नतीच्या ३ संधी मिळून अधिकारी पदावरून सेवानिवृत्त होता येईल. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस महासंचालक स्तरावर सुकाणू समिती गठित करण्यात येईल, अशी माहितीही गृहमंत्र्यांनी दिली. याशिवाय पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदोन्नती साखळी मधील पोलीस नाईक या संवर्गातील ३८ हजार १६९ पदे व्यपगत करण्यात आली असून ती पोलिस शिपाई, पोलिस हवालदार व सहायक पोलिस उपनिरीक्षक या संवर्गात वर्ग करण्यात येत आहे. यामुळे आता पुनर्रचनेनंतर पोलिस शिपायांची पदे १ लाख ८ हजार ५८, पोलिस हवालदारांची पदे ५१ हजार २१०, सहायक पोलिस उपनिरीक्षकांची पदे १७ हजार ७१ वाढतील. पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी मोठ्या संख्येने मिळाल्याने पोलीस अधिकाऱ्यांची गरज भागेल तसेच पोलीस दलामध्ये पोलीस हवालदार व सहाय्यक पोलीस उप निरीक्षक या तपासी अंमलदारांच्या सध्याच्या संख्येमध्येही भरीव वाढ होणार असल्याचे गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे पोलीस दलातील पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील वाढीमुळे एकूण तपासी अधिकाऱ्यांच्या संख्येत भरीव वाढ होणार आहे. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांवरील ताण निश्चितपणे कमी होईल, असा विश्वास गृहमंत्री यांनी व्यक्त केल्याची माहिती गृहमंत्रालयाच्या ट्विटरवरुन देण्यात आली आहे.

### दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना ...

परिसरातून अटक केली. या प्रकरणात पोलिसांनी वसई विरार ते चांदवली परिसरातील दोन हजारच्या आसपास सीसीटीव्ही तपासले. त्यात चांदवली येथे त्यांना एक आरोपी आढळून आला. त्याचा मागोवा घेत एका इमारतीतून त्यांना अटक केले. मुख्य आरोपी हरियाणा येथे जाण्याच्या अगोदर या आरोपीच्या घरी राहिले होते. मुख्य आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके हरियाणा येथे रवाना झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपी हे मुंबईत मजुरीचे काम करत होते. यातील एकाचे हरियाणामधील मुख्य आरोपीशी ओळख होती. महिनाभरापूर्वी त्यांची एका लग्नात भेट झाल्यावर त्याठिकाणी चोरीचा कट शिजवला. मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे आणि पोलिसांची गस्त अधिक असल्याने त्यांनी मुंबईत चोरी करायची नाही असे ठरविले. मुंबईत आल्यावर त्यांनी मुंबईच्या आसपासच्या परिसरात रेकी करण्यास सुरुवात केली. त्यांनी ठाणे, मीरा-भाईंदर, मुंब्रा, कळवा याठिकाणी त्यांनी तीन-चार दिवस रेकी केली. यात वसई-विरारमध्ये त्यांना महामार्ग जवळ असल्याने त्यांनी वसई सातिवली परिसराची निवड केली. मुख्य आरोपींना वसई-विरारचे आणि मुंबईचे रस्ते माहीत नसल्याने त्यांनी अटक आरोपींना सोबत ठेवले होते. आणि काम झाल्यावर त्यांना सोडून दिले.

### सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या रोजगार...

आले. तसेच ३९२ जण प्रतीक्षा यादीत असून त्यांनाही लवकरच नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचप्रकारे ज्यांची निवड सदर मेळाव्यात झालेली नाही त्यांना एक जॉबकार्ड देण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुढील एक वर्षभर त्यांच्या शिक्षणानुसार मुलाखतीसाठी बोलावण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस आयुक्त हरीश बैजल, सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. सदर प्रमुख कार्यक्रमाचे आयोजन पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, राखीव पोलीस निरीक्षक आनंद काजुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, कर्मचारी यांनी नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फौजदार सुबोध जमदाडे यांनी केले.

28 FEBRUARY TO 06 MARCH 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 26/02/2022 9:54 PM Page 1



# करोड पती बनण्याच्या नादात, घालवले लाखो रुपये!

**अंबरनाथ/सुनील तांबे**

फसवेगिरी हा एक धोका धाडीचा प्रकार असून असे प्रकार अनेक घडविले जातात. खूप दिवसा अगोदर एटीएम हा प्रकार नव्हता. पण कालांतराने नवीन नवीन शोध लागत गेले नवीन टेक्नॉलाजी निर्माण होऊन एटीएमचा शोध लावण्यात आला. बँकेमध्ये जर आपण रक्कम काढायला गेले तर कमी रक्कम असले तरी स्लिप भरून टोकन घेऊन पाय दुखे पर्यन्त लाईन मध्ये उभे राहा लागत असे. आणि नंतर टोकन नंबर आला की काउन्टर जवळ जाहून कॅसियर रक्कम देत होते. पण काळ बदलत गेला आणि नवीन नवीन टेकनालाजी उदयास आली म्हणजे एटीएम, एटीएममुळे लोकांचा बँकेतील त्रास कमी झाला काही दिवस सुरळीत चालय. पण काही भामटे फोन करून आम्ही बँके मधून बोलतोय असे सांगून तुमच्या एटीम कार्ड बंद होणार आहे, ते चालू राहण्या करिता तुमचा एटीएम कार्ड पिन कोडं विचारून बँक खात्यावून अवघ्या काही सेकंदात बँकखात्या मधून रक्कम निकाशी करायचे. नवीन नवीन पद्धत वापरून रक्कम लुटण्याचा प्रकार चालू आहे. अलीकडील काळात आर्थिक फसवणूकीचे प्रकार ज्यास्तच घडत आहे. जसे आवाच्या सवा रक्कमचा परतावा देणे. रक्कम दुपटीने परत करणे नाना तरेचे आमिष दाखवून फसवेगिरी चालूच आहे. अशीच घटना अंबरनाथ पूर्व शिवाजीनगर पोलीस स्टेशनंच्या हद्दीत घडली.



नेपाळी दाम्पत्या अंबरनाथ पूर्व येते वास्तव्यास असून असंगठीत कामगार आहे. बांधकामच्या ठिकाणी वाचमेनीचे काम करतात व धुनी भांडीची कामे करून आपला व आपल्या कुठुबाचा उधर निर्वाह करत होते. कल्पना मगर असं त्या नेपाळी महिलेचे नाव असून ती मूळ नेपाळची रहिवासी आहे. नेपाळ मध्ये असतांना गाहीका रुबीना बादी या गहिकेचा गीत गायनाचा कार्यक्रम नेपाळ मध्ये होता. त्या वेळेस कल्पना मगर सुद्धा रुबीना बादी या गहिकेचा प्रोग्राम बगायला गेल्या होत्या. रुबीना बादी कल्पना मगरला गहिकेचा चेहरा व नाव लक्ष्यात होते. कल्पना आणि गाहीका रुबीना बादी यांची फेसबुक वरती चॅटिंग करता, करता चांगलीच ओळख झाली. फेसबुक वरती बोलत असतांना कल्पनाने रुबीनाल आपली आर्थिक परिस्थिती सांगितली. ह्याच संदीचा फायदा घेत गहिकेने स्वतःच डोख चालवत कल्पना कढून पैसे कसे लुबडता येहिल याची योजना आखली. आणि आपल्या पतीच्या सातीने कल्पना कडे जाळ फेकला. रुबीनाने कल्पनाला सांगितले, तुझी किडनी विकून तुला चार करोड मिळतील पण ते बाहेर देशात जाहून विकावी लागेल. बाहेर देशात जाण्यासाठी आपल्याला परवाना काढून कागदाचं पाठपुरावा करावा लागेल. मी ते पूर्ण करते पण त्याच्या साठी काही खर्च येहिल. कमीत कमी दहा लाख खर्च येईल,तू मी दिलेल्या खाता संख्येच्या बँके मध्ये टाक असे सांगितले.कल्पनाने होकार देहून माहे मे २०२० ते माहे डिसेंबर २०२० पर्यन्त हळूहळू साडे आठ लाख रक्कम दिलेल्या खाता संखेवर जमा करण्यात आली. मात्र आपली किडनी कधी विकल्या जाणार व कधी परदेशात जायचे आहे असे वारंवार विचारले असता रुबीना उत्तरे द्यायला टाळा टाळ करू लागली.मग मात्र कल्पना मगरच्या लक्षात आलं की आपण कुठेतरी आपली फसवूणूक होत आहे. हे लक्ष्यात आल्यावर त्या महिलेने शिवाजी नगर पोलीस स्टेशनला आगस्ट २०२१ रोजी जाहून झालेली फसवेगिरी कथित केली व फिर्याद नोंदवली. फिर्याद नोंदविल्या नंतर शिवाजीनगर पोलीस स्टेशनंचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भोगे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस पथक नेमण्यात आले. टेक्निकल वापरून अथक प्रयत्ननाने अरविंद कुमार पत्ता शोधून काढला तो दिल्लीचा आढळून आला. राहण्याचा पत्ता कडल्यावर पोलीस पथक दिल्लीला रवाना करण्यात आले. पण अरविंद कुमार पोलिसाणच्या हाती लागला नाही. परत काही दिवसांनि अरविंद कुमार दिल्लीमध्ये आहे असे माहित पडले. पोलीस पथक दिल्लीला रवाना करण्यात आले. पोलिसानी अथक प्रयत्न आणि सिथापिणे अरविंद कुमार यांच्या मुसक्या अवळाल्या. पण रुबीना बादी मुख्य आरोपी अजूनही फरार आहे असे सांगण्यात येते. मुख्य आरोपीचा शोध चालू असून लवकरच अटक करण्यात येणार आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शना खाली व पोलीस पथककासह चालू आहे.

# प्रवशाला लुटणाऱ्या ऑटोवाल्याला पोलिसंनी १२ तासात केले जेरबंद!

**लातूर/करकरे अंबादास**




पोलीस स्टेशन शिवाजी नगर लातुर गुरन १०१/२०२२ कलम ३९२. ३४ भादवी मधील फिर्यादी नामे ओम संदीप इतापे वय २० वर्षे रा. बेलवाडी ता. श्रिगोंदा जि. अहमदनगर ह. मु. अर्बन बँक ट्युशन एरीया लातुर हा दिनांक २०/०२/२०२२ रोजी सात वाजून ५० मिनिटाला शिवाजी चौक वाडा हॉटेलकडे जाण्यासाठी शिवाजी चौकातील उभ्या ऑटोचालक व त्याचा साथीदार या दोघांनी फिर्यादीस वाडा हॉटेल येथे सोडतो म्हणुन प्रवासी म्हणुन ऑटोत बसवुन वाडा हॉटेल येथे न सोडता कन्हेरी चौकाचे पुढे अंधारात नेवुन टो थांबवुन ऑटो चालक व त्याचा साथीदार या दोघांनी फिर्यादीस ऑटोत दोन्ही बाजुने दाबुन धरुन त्याचे खिशातील नगदी रोख रक्कम व मोबाईल असा एकुण २१ हजार ४५० रुपयेचा माल जबरीने काढुन घेवुन फिर्यादीस त्याच ठिकाणी सोडुन निघुन गेले. वगैरे फिर्याद वरुन अज्ञात ऑटोचालक व त्याचा साथीदारा विरुद्ध पो. स्टे. शिवाजी नगर लातुर येथे गुन्हा दाखल होवुन तपास चालु असताना तपास दरम्यान गुप्त बातमीदारामार्फ खात्रीशीर बातमी मिळाली त्यावरुन पोलीस निरीक्षक डोलारे, पोलीस अमंलदार सफौ शमशोद्दीन काझी, गोविंद चामे, युवराज गिरी, काकासाहेब बोचरे यांनी सदर गुन्ह्यातील ऑटो व ऑटोचालक यांचा लातुर शहरात शोध घेवुन गुन्हा घडल्यापासुन १२ तासात आरोपीतांचा व ऑटोचा शोध घेवुन आरोपी नामे ईश्वर दिंगबर सवासे वय २२ वर्षे रा. कासारजवळा ता. जि. लातुर, मनोज कोडींराम सरवदे वय २२ वर्षे रा. काडगाव ता. जि. लातुर व ऑटो क्रमांक एम एच २४ ए टी २१३९ सह ताब्यात घेवुन त्यांचेकडुन सदर गुन्ह्यातील जबरीने चोरी केलेली रक्कम व मोबाईल तसेच गुन्ह्यात वापरलेले वाहन टो असा एकुण ७१ हजार ४५० रुपयेचा माल हस्तगत केला आहे. सदरची कामगीरी निखील पिंगळे, पोलीस अधिक्षक लातुर व अनुराग जैन, अपर पोलीस अधिक्षक लातुर तसेच जितेंद्र जगदाळे पोलीस उपअधिक्षक लातुर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि डी. एस. डोलारे, पोलीस अमंलदार सफौ शमशोद्दीन काझी, गोविंद चामे, युवराज गिरी, काकासाहेब बोचरे यांनी कामगीरी पार पाडली.

# शहर स्वच्छतेचे पालिकेचे नवे नियम

**वसई/प्रतिनिधी**

वसई–विरार शहर महापालिकेची कचऱ्याची समस्या मोठी आहे. तसेच कचरा स्वच्छतेसाठी पालिकेने रस्त्यावर ठेवलेल्या कचरा कुंड्या हटविण्यात येणार आहेत. कचरा रस्त्यावर टाकू नये म्हणून पालिका यापुढे दक्ष राहणार आहे. कचरा इतस्त: टाकल्यास पालिकेकडून दंड आकारला जाईल. शहर स्वच्छ रहावे म्हणून पालिका नव्याने उपाययोजना करीत आहे. पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांकडून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी उपाययोजना केली जाणार आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी असलेल्या सर्व कचराकुंड्या महापालिकेकडून हटविण्यात येणार आहेत. वसई–विरार शहरात ७०० टन कचरा रोज उचलला जातो. तो गोखिवरे येथील डंपिंग ग्राऊंडवर टाकला जातो. त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेची उपाययोजना सुरु आहे. जेणेकरून शून्य कचरा मोहिम राबवता येईल. परंतु सार्वजनिक ठिकाणी ठेवण्यात येणाऱ्या कचराकुंड्यात मोठ्या प्रमाणात कचरा जमा होतो व दुर्गंधी, डासांचे प्रमाण वाढत असते. अनेकदा नागरी वस्तीतील कचरा उचलला जात नाही. त्यामुळे प्रदूषण व आरोग्याचा प्रश्न उद्भवत असतो. नागरिकांना होणारा त्रास पाहता व शहर सुंदर व स्वच्छ राहण्यासाठी महापालिकेने पहिल्या टप्प्यात कचराकुंडीमुक्तीचा निर्णय घेतला आहे. व्यापारी, दुकानदार, प्रवासी हे सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकत असतात. त्याकरिता महापालिकेने कचराकुंडीची व्यवस्था केली आहे. परंतु यापुढे कचराकुंडीमुक्त शहर बनविण्यासाठी प्रशासनाने शाश्वत पाऊल उचलले असून शहरामध्ये ओला व सुका कचरा टाकण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणीच कचराकुंड्या ठेवण्यात येणार आहेत. त्याच ठिकाणी नागरिकांना कचरा टाकता येईल. कचरा रस्त्यावर टाकल्यास २०० रु. दंड केला जाणार आहे.

# सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात, तीन गुन्ह्यांची कबुली, लाखोंचा मुद्देमाल जप्त



**लातूर/प्रतिनिधी**

लातूरत चोरीची दुचाकी विक्री करण्यासाठी आलेल्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला लातूर जिल्हा गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी सापळा रचून अटक केली. ही कारवाई बाभळगाव रोडवरील म्हाडा कॉलनीतील कमान येथे गुरुवार दिनांक २४/०२/२२ रोजी करण्यात आली. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली टाटा पिकअप व एक दुचाकी असा एकूण ६ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रकाश गिरी वय ३३ वर्षे, रा. हासेगाववाडी, ता. औसा (ह.मु.ड्रायव्हर कॉलनी,जुना औसा रोड, लातूर) असे अटक करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. म्हाडा कॉलनी कमानीजवळ एक रेकॉर्डवरील गुन्हेगार पांढऱ्या रंगाच्या पिकअप गाडीमध्ये दुचाकी विक्री करण्यासाठी थांबला असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारामार्फत समजली. कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांच्या नेतृत्वातील पथकाने मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे म्हाडा कॉलनी कमान जवळ दुचाकी विक्रीसाठी आलेला सराईत गुन्हेगार प्रकाश गिरी यास ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता नमुद आरोपीने त्याचे कब्जात मिळालेल्या पिकअप वाहन एमआयडीसी पोलीस ठाणे गुरनं ९३/२०२२ कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्ह्यात व त्या पीकअप मध्ये मागील बाजूस असलेली होंडा कंपनीची दुचाकी शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं १०७/२०२२ कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले. यासोबतच तीन महिन्यापूर्वी एक चॉकलेटी रंगाचा आयशर टेम्पो चोरी केला होता, तो टेम्पो एका मंदिरासमोर थांबवून विक्री करण्यासाठी ग्राहक शोधायला गेला असता गांधी चौक पोलिसांनी तो टेम्पो हस्तगत केला असल्याचे सांगितले. या गुन्ह्यातही गांधी चौक पोलीस ठाणे गुरनं ६०६/२०२१ कलम ३७९ भारतीय दंड अन्वये गुन्ह्यात ही त्याचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.

कारवाई कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार अंगद कोतवाड, बालाजी जाधव, खुर्रम काझी, माधव बिलापट्टे, राजेश कंचे, राजाभाऊ मस्के, मोहन सुरवसे, नितीन कठारे, जमीर शेख, प्रदीप चोपणे यांच्या पथकाने बजावली आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### सार्वजनिक सेप्टीक टँक स्फोट, एक ठार, दोन जखमी

भिवंडी : भिवंडी महापालिका क्षेत्रात सकाळी साडेनऊ वाजता च्या सुमारास चव्हाण कॉलनी येथील एका सार्वजनिक शौचालयाची सेप्टीक टँक मध्ये स्फोट होऊन त्यामध्ये एका वृद्धाचा दुर्देवी मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहे. सदरचे शौचालयचे महापालिके कडून चव्हाण कॉलनी येथे सुमारे १५ वर्षा पूर्वी सदरचे सार्वजनिक शौचालय उभारले असून ते खाजगी ठेकेदार मार्फत परीचालना साठी दिले असून त्या ठिकाणी योग्य ती काळजी न घेतल्याने सेफ्टीक टँक स्वच्छता न राखल्याने शौचालयात काही नागरीक शौचास गेले असता तेथील शौचकूपा खालील टँकमध्ये स्फोट झाल्याने तेथे शौचास बसलेले टोघे जण टाकीत पडले त्यामध्ये ७० वर्षीय इब्राहिम शेख यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोन जखमी व्यक्तींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी पालिका आपत्कालीन कक्षास दिली असता भिवंडी पालिका आपत्कालीन विभाग व अग्निशमन दल जवान व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन लोकांना मदत कार्य केले.

### देवणी येथील सरुबाई नळगिरे यांचे निधन



देवणी: येथील श्रीमती सरूबाई वैजनाथअप्पा नळगिरे वय ७३ वर्ष यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार (दि. २५) फेब्रुवारी रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर देवणी येथील वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत शनिवार दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, दोन भाऊ, सुन, जावाई असा परिवार आहे.

### हत्तेनगर येथे नोंदणी मार्गदर्शन विशेष कॅम्प

लातूर : लातूर अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियमन २०११ हा महाराष्ट्रासह संपूर्ण देशात ५ ऑगस्ट, २०११ पासून लागू करण्यात आला आहे. या कायद्याचा प्रमुख उद्देश जनतेस सुरक्षित, सकस व निर्भेळ अन्न उपलब्ध करुन देणे हा आहे. त्याअंतर्गत अन्न व्यावसायिकांसाठी परवाना व नोंदणी घेणे आवश्कय आहे. सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी ११.०० ते २.०० या वेळेत कृष्णा एजन्सीज, हत्ते नगर, लातूर येथे परवाना व नोंदणीबाबत विशेष कॅम्प आयोजित करण्यात आलेला आहे असे सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### भामट्यांनी वृद्ध भाजीविक्रेत्या महिलेचे सोने लुबाडले

भिवंडी : कुकसे बोरीवली येथून भाजीपाला विक्रीसाठी भिवंडीत येणाऱ्या भाजी विक्रेत्या वृद्ध महिलेचे सोन्याचे दागिने दोन अनोळखी भामट्यांनी लुबाडून पोबारा केला केल्याची घटना निजामपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ठक्कर स्वीट रस्त्यावर रविवारी घडली आहे. सुनिता नामदेव देसले (वय ५५) रा बोरिवली असे वृद्ध भाजीविक्रेत्या महिलेचे नाव असून ही वृद्ध महिला रविवारी दुपारी आपला भाजीपाला विक्री करून घरी जात असताना टक्कर स्वीट समोरील रस्त्याने पायी जात असताना दोघा अनोळखी इसमांनी त्यांना थांबवून माझे सेठ पुढे गोरगरिबांना धान्य वाटतात तुम्हाला सुद्धा ते धान्य देतील पण तू गरीब दिसावी म्हणून तू तुझे कडील असलेले दागिने तुझे पाकीटामध्ये ठेव असे सांगून वृद्ध महिलेच्या गळ्यामधील सोन्याचे मणी असलेली माळ कानातील सोन्याची कर्णफुले व कानातील सोन्याची साखळी असा एकूण ९५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पाकिटात ठेवले असता दोघा अज्ञात इसमांनी वृद्ध महिलेचे सोन्याचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी वृद्ध महिलेने निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# बीड जिल्हाधिकारी कार्यालयात गोळीबाराचा थरार; नगरसेवकानेच दोघांवर झाडल्या गोळ्या

**बीड/प्रतिनिधी**



बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयात गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील रजिस्ट्री ऑफिसमध्ये एका नगरसेवकानं आपल्या काही साथीदारांच्या मदतीनं दोघांना काठीने आणि लाथा–बुक्क्यांनी मारहाण करत, दोघांवर गोळीबार केला आहे. या दुर्दैवी घटनेत दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. गोळीबाराच्या या थरारानंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जिल्हाधिकारी कार्यालयात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. सकाळी अकराच्या सुमारास बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील रजिस्ट्री ऑफिसमध्ये काही जणांमध्ये जमिनीचा वाद सुरू होता. मोठा आवाजात बाचाबाची सुरू असल्याने अनेक आसपासच्या नागरिकांनी याठिकाणी गर्दी केली होती. जमिनीचा वाद विकोपाला गेल्यानंतर बीडमधील एका नगरसेवकानं आपल्या काही साथीदारांच्या मदतीनं दोन जणांना बेदम मारहाण केली आहे. आरोपींनी काठी आणि लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी उपस्थित काही लोकांनी भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला. पण संतापलेल्या नगरसेवकानं आणि त्यांच्या साथीदारांनी सतीश क्षीरसागर आणि फारुक सिद्दीकी या दोघांवर गोळीबार केला आहे. या थरारक घटनेत सतीश क्षीरसागर यांच्या पायाला गोळी लागली असून खोलवर जखम झाली आहे. तर फारुक सिद्दीकी यांच्या पायाला गोळी चाटून गेली असून तेही या घटनेत जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर सर्व पुरावे गोळा केले आहेत. तसेच प्रत्यक्षदर्शींकडून माहिती घेतली आहे. दोन्ही जखमींवर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार केले जात आहे. सकाळी अकरा वाजता जिल्हाधिकारी कार्यलयातच हा धक्कादायक प्रकार घडल्याने परिसरात तणाव निर्माण झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# शिवसेनेच्या माजी शाखाप्रमुखाच्या मुलाची रिक्षा चालकाला बेदम मारहाण

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यामध्ये धक्कादायक घटना समोर आली आहे. शिवसेनेच्या माजी शाखा प्रमुखाच्या मुलाला रिक्षाची धडक का दिली विचारल्याच्या रागातून एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला केला आहे. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. नालासोपारा पूर्व नगीनदास पाडामधील माजी शिवसेना शाखा प्रमुख गणेश मेधेकर यांचा मुलगा सागर मेधेकर याने एका व्यक्तीला शुल्लक कारणावरून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. केवळ किरकोळ वादातून सागर मेधेकर याने अब्दुल हाफिज नावाच्या व्यक्तीला बेदम मारहाण केल्याचे समोर आले आहे. माजी शिवसेना शाखा प्रमुख यांचा मुलगा सागर हा रिक्षाचालक आहे. अब्दुल हाफिज हे आपल्या मुलाला ट्युशन क्लास मधून घरी परत घेऊन जात असताना सागर मेधेकर याने हाफिज यांना रिक्षाने धडक दिली. मात्र हाफिज यांनी मेधेकर याला विचारणा केली. त्यामुळे रागाच्या भराता सागर मेधेकर याने हाफिज यांना बेदम मारहाण केली आहे. अब्दुल हाफिज यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना नजीकच्या नालासोपारामधील वसई विरार महापालिकेच्या तुळींज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या संदर्भात आरोपी सागर मेधेकर याला तुळींज पोलिसांनी अटक केली असून पुढील कारवाई सुरू आहे.

# आम आदमी पार्टी लातूर शहर कार्यकारिणी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**

आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रताप भोसले यांच्या अध्यतेखाली झालेल्या बैठकीत लातूर शहर आम आदमी पार्टीची कार्यकारिणी निवडण्यात आली.त्यामध्ये अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष अमित पांडे, सचिव सुमीत दीक्षित, उपाध्यक्ष दिपक कानेकर,बालाजी माने,शफि चौधरी,कोषाध्यक्ष दिनेश मरेवार, सचिव मडिया हरी गोटेकर, सदस्य लीगल सेल ऍड.अतिक शेख, सदस्य ऍड.जयप्रकाश जैन, सोहेल शेख यांचा समावेश आहे. नूतन पदाधिकार्यांचे अभिनंदन करुन जिल्हाध्यक्ष प्रताप भोसले यांनी पक्षाचे कार्य व विस्तार करण्याच्या सूचना केल्या.

# सोलापूर येथे नगरसेवक कामाठी, विजापुरे, पापा शेठ यांना अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर पोलीस आयुक्त यांच्या विशेष पथकाने एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैद्य मटकावर कारवाई करून सुमारे ३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे याप्रकरणी १३ जणांवर गुन्हा दाखल झाला असून नगरसेवक सुनील कामाटी यांच्यासह ह्यात विजापुरे व पापा शेठ या तिघांना पोलिसांनी अटक केली व नंतर त्यांची जामिनावर सुटका झाली. विशेष पथकाने बुधवारी पाण्याच्या टाकीजवळ चेतन हॉटेल, कुंभारी रस्ता, बनशंकरी हॉटेलजवळ, जुना कुंभारी नाकाजवळ, अक्कलकोट नाका, विडी घरकुल, लक्ष्मी चौक आदी परिसरात मटका घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर विशेष पथकाने धाड टाकले. यामध्ये जुगार साहित्य रोख रक्कम जुगारासाठी वापरण्यात आलेली मोटरसायकल मोबाईल हँडसेट असा एकूण २ लाख ९५ हजार ४५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यावेळी योगेश प्रेमनाथ शिंदे, महावीर शंकरलिंग परदेशी, अनिल करबसप्पा गोब्बूर, मल्लेश अंबाजी दंडी, रमेश बाबुराव मंगुडकर, संतोष चंद्रकांत जेडगे, मल्लिनाथ रामचंद्र जाधव, विष्णू अंबादास येलदी, रवींद्र सत्यनारायण वडनाल यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर सदरचा मटका इस्माईल बाबूलाल मुच्याले हा चालवीत असल्याचे समजले. त्यामुळे मुच्याले ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी इतर तीन भागीदार सुनील कामाटी यात विजापुरे व पापा शेठ यांची नावे सांगितली. त्यानंतर पथकाने या तिघां भागीदारांचा शोध घेतला, परंतु ते मिळाले नव्हते दरम्यान गुरुवारी पोलिसांनी या कामाठीसह तीन भागीदारांना अटक केली. यानंतर तिघांसह तेरा जणांची जामिनावर सुटका करण्यात आली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे, पोलीस अंमलदार दिलीप बाळशंकर, योगेश बर्डे, वाजिद पटेल, संजय साळुंखे, नरेंद्र नाथा यांनी केली आहे.

# नवाब मलिकांना मंत्रिमंडळातून काढण्याचा 'ठाकरी बाणा' मुख्यमंत्री दाखवणार का? आ.संभाजी पाटील यांचा सवाल



**लातूर/प्रतिनिधी**

बॉम्बहल्ले करून शेकडो मुंबईकरांचे बळी घेणारा आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिम याचा हस्तक असलेल्या नवाब मलिक यांना सत्तेच्या लाचारीसाठी मंत्रीपदावर ठेवणे हा महाराष्ट्राचा अपमान असून उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दबावापुढे न झुकता मलिक यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून ठाकरी बाणा दाखवणार का, असा सवाल माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केला. दाऊदचा हस्तक असल्याचा आरोप हा देशद्रोहाएवढाच गंभीर असल्याने असा ठपका असलेला मंत्री राज्याच्या मंत्रिमंडळात असणे सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे, असे ते म्हणाले. मुंबई महापालिकेसह अन्य निवडणुकांवर डोळा ठेवून मुस्लिमांच्या अनुनयाकरिता देशद्रोही दाऊदच्या हस्तकास अभय देण्याचे हीन राजकारण ठाकरे सरकारच्या अधोगतीस कारणीभूत ठरेल असा इशाराही माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिला. नवाब मलिक यांनी दाऊदच्या दहशतवादी कारवायांकरिता पैसा जमा करण्याच्या कटास साह्य केल्याचा आरोप असून त्यासाठीचे सज्जड पुरावे 'ईडी'कडे असल्याचा दावा करण्यात आला आहे. ज्या दाऊद इब्राहीमने १९९२ मध्ये मुंबईत भीषण बॉम्बस्फोट घडवून शेकडो निरपराध नागरिकांचे बळी घेत देशाविरुद्धचा सर्वात घातक दहशतवादी कट आखला, त्याच दाऊदशी नवाब मलिक यांची हातमिळवणी असल्याचा गंभीर आरोप ईडीकडून करण्यात येत असतानाही मलिक यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेण्यास विरोध करण्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या लांगूलचनाच्या राजकारणाची मोठी किंमत महाराष्ट्राला मोजावी लागेल. अशा देशद्रोही कारवायाना मदत केल्याचे पुरेसे पुरावे ईडीकडे असल्याचे सांगण्यात येत असतानाही मलिक यांना मंत्रिपदावर ठेवण्याच्या दबावापुढे झुकून मुख्यमंत्री ठाकरे यांनी आपण कणाहीन राजकारणी असल्याचे सिद्ध केले आहे, अशी टीकाही माजीमंत्री आ. निलंगेकर यांनी केली.

१९९२-९३ च्या बॉम्बस्फोटात दाऊदच्या हल्ल्यापासून मुंबईकरांचे संरक्षण करणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांचे वारस आज मात्र, मुख्यमंत्रीपद आणि सत्तेच्या हव्यासापोटी दहशतवादी दाऊदच्या हस्तकास वाचविण्याचा घातक खेळ करत आहे, असा आरोप करून, ठाकरे यांच्या कणाहीन राजकारणामुळे महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेस धोका निर्माण होईल,असा इशाराही त्यांनी दिला. बाळासाहेबांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी हिंमत असेल तर आता मलिक यांची हकालपट्टी करावी, असे ते म्हणाले. याआधी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ...पान ६ वर

# भिवंडी प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार यांना ६ लाखांची लाच घेताना रंगेहात अटक!

**भिवंडी/आकाश गायकवाड**



भिवंडी प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार असलेल्या एका लाचखोर अधिकाऱ्याला ६ लाखांची लाच घेताना मुंबई अँटी करप्शन पथकाने सापळा रचून रंगेहात अटक केली आहे. विठ्ठल रामभाऊ गोसावी असे लाच प्रकरणी रंगेहाथ अटक केलेल्या नायब तहसीलदाराच नाव आहे. मध्य रेल्वेच्या कल्याण-कसारा तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे काम सुरु आहे. त्यासाठी रेल्वे लगतच्या शेत जमिनी शासनाला हस्तांतर करून त्याबद्दल मोबदला देण्यात येत आहे. अशाच एका शेतकऱ्याची रेल्वेच्या तिसरा लोहमार्गात बाधित होणाऱ्या जमिनीसाठी एका खाजगी व्यक्तीकडून तक्रारदार यांना लाचखोर गोसावीने बाधित जमिनीचा मोबदला देण्यासाठी ८ लाखांची मागणी केली होती. मात्र त्यामध्ये तडजोड होऊन लाचेची रक्कम ६ लाख देणे ठरले होते. या दरम्यान तक्रारदार यांनी मुंबई अँटी करप्शन विभागात नायब तहसीलदार गोसावी व एका खाजगी व्यक्ती विरोधात लेखी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई नायब तहसीलदार गोसावी आज दुपारच्या सुमारास भिवंडी प्रांत कार्यालयात सापळा रचला असता नायब तहसीलदार गोसावीला ६ लाखांची लाच घेताना रंगेहात ताब्यात घेतले असून त्यांच्यासह एका खाजगी व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. तर गोसावी राहत असलेल्या निवासस्थानीही एक पथक दाखल होऊन त्यांच्या घराची झाडाझडती घेत असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच प्रांत कार्यालयाच्या आवारात लाचखोर गोसावी यांच्या कारची तपासणी करून त्यामधील काही कागदपत्रे चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

# नवी मुंबई येथे माहिती व जनसंपर्कच्या कोंकण विभागाचे समाज माध्यम विषयक प्रशिक्षण संपन्न




**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोंकण विभागातील वृत्त व समाजमाध्यम विषयक काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विभागीय माहिती कार्यालय कोंकण भवन येथे विविध समाजमाध्यमे सुलभतेने हाताळण्यासाठी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि कोकण भवन येथील अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन कामातील गुणवत्ता वाढीसाठी तसेच समाजमाध्यमामधील नवीन तंत्रज्ञान आत्मसात होण्यासाठी आणि अधिकाधिक माहिती जनतेसाठी पोहचविण्यासाठी या नवनवीन माध्यमांच्या माहितीसाठी हे प्रशिक्षण महत्वाचे आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक दिपक कपूर यांनी विभागीय माहिती कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयांनी समाजमाध्यमांवर सतत अग्रेसर असावे, असे आवाहन केले होते त्या आवाहनानूसार आज या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कोंकण विभागातील जनतेला महाराष्ट्र शासनाच्या योजना अधिकाधिक पोहचविण्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी उपयोग करावा असे आवाहन कोंकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी यावेळी केले. श्री लिलाई डिजीटल कम्युनिकेशन लि. यांच्या वतीने प्रणवकुमार भदाणे आणि प्रियन म्हस्कर यांनी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी समाज माध्यमांचा सुलभतेने व दक्षतेने कसा वापर करावा या विषयावर प्रात्यक्षिकासह तांत्रिक मार्गदर्शन केले. संगणक आणि मोबाईलचा उपयोग करताना सुरक्षितता असणे कसे आवश्यक आहे. या सोबतच अधिकाधिक लोकांच्या समोर जातांना कोणती नवमाध्यमे उपयुक्त ठरतील. याबाबतही माहिती त्यांनी दिली. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांना प्रत्यक्ष कामात येणाऱ्या अडचणीबाबत प्रश्नोत्तरे झाली.... पान ६ वर

# सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या रोजगार मेळाव्यात ६९२ युवक, युवतींना नियुक्तीपत्र



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यात तब्बल १४०० जणांनी मुलाखती दिल्या त्यातील ६९२ युवक व युवतींना जागेवरच नियुक्तीपत्र देण्यात आली. यामध्ये २९ कंपन्यांनी सहभाग नोंदविला. सोलापूर शहरातील गुरुवारी ग्रामीण पोलीस मुख्यालयात ग्रामीण पोलीस दलातर्फे रोजगार मेळावा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंम्मत जाधव, पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील यांनी दीपप्रज्वलनाने केले. यावेळी पोलीस अधीक्षक सातपुते म्हणाल्या, विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी वार्षिक पोलीस निरीक्षण दरम्यान पोलीस पाल्यांसाठी रोजगार मेळावा आयोजित करण्याची सूचना केली होती. या संकल्पनेची अंमलबजावणी करीत असताना ऑपरेशन परिवर्तन मधील मुले तसेच शिक्षित पारधी समाज बांधवांची मुले यांच्यासाठी हा उपक्रम राबविण्याचे ठरवले व आज पोलीस मुख्यालय येथे पोलीस पाल्य ऑपरेशन परिवर्तन गट व पारधी समाजातील विद्यार्थी अनाथ मुले यांना त्यांच्या शिक्षणानुसार नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याकरिता पोलीस कल्याण नोकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या रोजगार मेळाव्यामध्ये मेकॅनिकल, आयटी, सुरक्षारक्षक अशा विविध क्षेत्रातील सोलापूर, पुणे, कोल्हापूर या ठिकाणच्या सुमारे २९ कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवली. रोजगार मेळाव्यात १४०० पेक्षा अधिक युवक-युवतींनी मुलाखती दिल्या, तसेच ६९२ युवक व युवतींना नियुक्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात ...पान ६ वर

# सोलापूर शहरात दामिनी पथक पुन्हा सक्रिय



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील महिलांवर व शाळकरी मुलीवरील अत्याचारास दामिनी पथक सोलापूर शहरात पुन्हा सक्रिय झाली आहे. यामुळे अत्याचारास आळा बसणार असे सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी व्यक्त केले. गुरुवारी पोलीस आयुक्तालयातील दामिनी पथक नव्या स्वरुपात कार्यान्वित झाले असून यात पथकाच्या वाहनाला पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी हिरवा झेंडा दाखवला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी या कार्यक्रमात डीसीपी डॉ.दिपाली धाटे घाडगे, डॉ.पोलीस उपायुक्त वैशाली कडूकर, बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे डॉ. प्रीती टिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथक पुन्हा सक्रिय करण्यात आली. दामिनी पथकामध्ये १ महिला पोलीस अधिकारी, १३ महिला पोलीस अंमलदार व २ महिला पोलीस चालक असून पथकांच्या दिमतीला २ स्कॉर्पिओ वाहने देण्यात आली आहेत. हे पथक शहर हद्दीत सतत गस्त घालणार असून सोलापुरातील शाळा महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतील. तेथील महिला विद्यार्थ्यांनी यांना कायद्याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करतील जर एखादी महिला अनुचित प्रकारास बळी पडल्यास तिने निर्भयपणे दामिनी पथकास होत असलेल्या अन्यायाबाबत माहिती ...पान ६ वर

# हजारो पोलीस हवालदारांचे पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण होणार!

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात पोलिसांचं अतुलनीय योगदान कुणीही नाकारणार नाही. अशा पोलिस दलासाठी राज्य सरकारनं एक महत्वाचा निर्णय घेतला होता. मागील वर्षी दसऱ्याच्या मुहूर्तावर राज्य सरकारनं पोलिसांच्या पदोन्नतीबाबत महत्वाचा निर्णय घेतला होता. मात्र, आज त्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. तशी माहिती गृहमंत्रालयानं दिलीय. राज्यातील हजारो पोलीस हवालदारांचे पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण करणारा शासन निर्णय आज जारी करण्यात आल्याची माहिती गृहमंत्र्यालयाकडून देण्यात आलीय. राज्यातील हजारो पोलीस हवालदारांचे पोलिस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण करणारा शासन निर्णय आज झाला आहे. यामुळे पोलीस दलाच्या बळकटीकरणास चालना मिळेल तसेच गुन्ह्यांची उकल होण्यास व गुन्हे रोखण्यास मदत होईल असा विश्वास गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केलाय. राज्यातील अंमलदारांना वर्षानुवर्षे सेवेनंतरही पोलीस उपनिरीक्षक या अधिकारी पदावर पोहचता येत नसल्याने त्यांना पदोन्नतीचा लाभ देऊन अधिकारी होता यावे या दृष्टीकोनातून हा प्रस्ताव गृहविभागाने तयार केला होता. या निर्णायाला आज मंजुरी दिल्याबद्दल गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानले आहेत. या पदोन्नतीचा थेट फायदा भविष्यात हजारो पोलीस शिपाई हवालदार, सहायक पोलिस निरीक्षक यांना होणार आहे. ...पान ६ वर

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे देवणीत निदर्शने

## अल्पसंख्याक मंत्री नवाब मलीक यांच्यावर सुडबुद्धीने केलेल्या कारवाईच्या निषेधार्थ नायब तहसीलदार माडजे मॅडम यांना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाबभाई मलीक यांच्यावर सुडबुद्धीने करण्यात आलेल्या कारवाईच्या निषेधार्थ शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता बोरोळ चौक येथे देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निदर्शने करण्यात आली व केंद्र सरकारच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. 'भाजप हमसे डरती है' इडी को आगे करती है, एक नवाब सौ जवाब, नवाब भाई तुम आगे बडो हम तुम्हारे साथ है!' या जयघोषाने परीसर दुमदुमला होता.

आंदोलनकर्त्यांनी देवणी तहसीलचे नायब तहसीलदार माडजे मॅडम यांना निवेदन सादर केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रा.अनिल इंगोले, अल्पसंख्याक सेलचे प्रदेश महासचीव प्राचार्य फकरोद्दीन बुदरे, कृ.उ.बा.स.चे सभापती शांतवीर कन्नाडे यांच्या नेतृत्वाखाली हि निदर्शने करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवरानी केंद्र सरकार इडीचा वापर कशा पद्धतीने करून घेतो, यासंदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले. प्रामुख्याने या अंदोलनात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचीव मनोज कन्नाडे कार्याध्यक्ष अनिल कांबळे, डॉ मल्लीकार्जुन सुरशेट्टे, जितेंद्र शिवगे, अमरदिप बोरे, माजीद तांबोळी, महेश जाधव, सचिन गवळी, गफुर शेख, शकिल मनियार, लक्ष्मण रणदिवे, कृष्णा पिंजरे, दत्ता चाळकापुरे, सिद्धेश्वर पाटील, असलम तांबोळी, ओमकार पाटील, सचिन घाळे, सोमनाथ पाटील, वैभव म्हत्रे, आविनाश गरड, सोहेल शेख यांच्यासह असंख्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते व तसेच हे अंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडला. यावेळी पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## स्टेट बँकेच्या एटीएममधून २० लाखांची चोरी प्रकरणी

# दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश



**वसई/प्रतिनिधी**

वसई पूर्व वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील आठवड्यात चार चोरट्यांनी एसबीआय बँकेचे एटीएम फोडून २० लाख रुपयांची रोकड लंपास केली होती. या प्रकरणी दोन आरोपींना मुंबईतून अटक करण्यात आली असून या चोरांच्या शोधासाठी पोलिसांनी सुमारे २ हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. मुख्य सूत्रधार अद्याप पसार असून ते हरियाणातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली. वसई पूर्वमधील सातिवली परिसरातील मोर्या नाका येथे मागील आठवड्यात सोमवारी मध्यरात्री चार चोरट्यांनी वीज गेल्याचा फायदा घेऊन एसबीआय बँकेचे एटीएम फोडले होते. त्यामधून सुमारे २० लाख रुपयांची रोकड लंपास केली होती. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन सीसीटीव्हीच्या चित्रफीत ताब्यात घेतले असता सीसीटीव्हीमध्ये वीजपुरवठा बंद असल्यामुळे चोरट्यांचा चेहरा दिसला नाही, मात्र चोरीसाठी वापरण्यात येणारी चारचाकी दिसून येत होती. याआधारे पोलिसांनी या गाडीचा शोध घेतला असता गाडीचा क्रमांक आरोपींनी बदलला होता. याच गाडीतून मुख्य आरोपींनी हरियाणाला पलायन केले. तर इतर दोन आरोपी मुंबईत असल्याची खबर पोलिसांना लागली. त्यानुसार इम्रान खान (३०) आणि उमेश प्रजापती यांना चांदवली ...पान ६ वर

# आ. राजेश पाटील यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन!



**विरार/प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील बोईसर विधानसभा क्षेत्रातील मौजे साखरे आणि दहिसरतर्फे मनोर येथील रस्त्याचे बोईसर विधानसभेचे आमदार राजेश पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून आणि ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या विकासकामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत आमदार राजेश पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी बविआचे पगार तालुका अध्यक्ष नागेश पाटील, बविआ नेते अॅड. नितीन भोईर, दहिसर तर्फे मनोरचे माजी सरपंच दशरथ जाधव, साखरे उपसरपंच प्रवीण पाटील, माजी सरपंच श्रीमती दर्शना नोक्की, बविआ नवसई अध्यक्ष मयूर कुडू, सदानंद पाटील, प्राजक्त ठाकूर अब्दुल शेख, संजय पाटील, सारीका पाटील, नरेंद्र पाटील, नारायण पाटील, सहदेव पाटील, विपुल वझे, प्रशांत वझे, बेबी नोक्की, वैभव पाटील, राजु नोक्की तसेच बहुजन विकास आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वराज्य राज्यव्यापी कामगार संघटना

नोंदणी क्रमांक - काउआ/ठाणे/१९८०/२०२२ स्थापना : २०२२



संस्थापक अध्यक्ष

श्री. प्रशांत आर. धोंडे

संपर्क : ७३५०३१६४८७

कार्यालयीन पत्ता : शॉप नं. ५१८, टेंभी, कोल्हापूर, आगाशी, बाजार पेठ, विरार (प.),ता. वसई, जि. पालघर

संपर्क कार्यालय : महात्मा फुले नगर, चक्रेश्वर अपार्टमेंट समोर, सोपारा रोड, नालासोपारा (प.), ता.वसई, जि. पालघर, Email - prashantdhonde14@gmail.com